cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२० | शनिवार, दि.१० मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पाकिस्तान पूर्णपणे एकाकी !

'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केवळ एक लष्करी कृती नव्हे, तर भारताच्या दृढ इच्छाशक्तीची आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील सजगतेची ठोस ओळख आहे. या ऑपरेशनने पाकिस्तानला न केवळ अद्दल घडवली तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताच्या निर्णायक नेतृत्वाची छाप उमटवली. पाकिस्तानने गत काही वर्षांत सातत्याने भारतविरोधी कारवायांमध्ये सहभाग घेतला आहे. सीमारेषेवर घुसखोरी, दहशतवादाला खतपाणी घालणे आणि शस्त्रसज्ज कट रचणे हे सारे प्रकार वारंवार भारताच्या संयमाची परीक्षा घेत होते.

### एका आठवड्यासाठी आयपीएल स्थगित


नवी दिल्ली भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. इंडियन प्रीमियर लीगचा १८ वा हंगाम एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत वेळापत्रकातील बदल आणि उर्वरित सामन्यांचे आयोजन यासंदर्भातील परिस्थितीचे आकलन केल्यानंतर नवी माहिती दिली जाणार आहे. सर्व फ्रँचायजी आणि भागीदारांसोबत चर्चा केल्यानंतर स्पर्धा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. बीसीसीआयने भारतीय सैन्यावर विश्वास दाखवत आणि सर्व घटकांच्या हितासाठी निर्णय घेण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. बीसीसीआयने या परिस्थितीमध्ये भारतासोबत असल्याचे म्हटलें आहे. आयपीएलच्या १८ व्या हंगामात ५८ मॅचेस झालेल्या आहेत.

# सरकारकडून उद्दिष्टाच्या केवळ २६ टक्केच तुरीची खरेदी

## तूर खरेदीला मुदत वाढ मिळण्याची शक्यता

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**राज्य सरकारने आत्तापर्यंत एकूण खरेदी उद्दिष्टाच्या २६ टक्के तुरीची खरेदी केली आहे. १३ मे रोजी तुरीची खरेदी मुदत संपणार आहे. त्यामुळे तूर खरेदीसाठी मुदत वाढ मिळावी, यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. त्यामुळे तूर खरेदीला मुदत वाढ मिळण्याची शक्यता आहे. परंतु या हंगामात खुल्या बाजारात तुरीला हमीभावाच्या खाली दर मिळत असूनही तुरीच्या सरकारी खरेदीनें गती घेतली नाही. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांना तुरीच्या सरकारी खरेदीपासून वंचित राहावे लागल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.**



केंद्र सरकारने राज्याला १०० टक्के तूर खरेदीचे निर्देश दिले. २०२४-२५ मध्ये राज्यात १२ लाख टन तुरीचे उत्पादन झाले. परंतु राज्य सरकारने मात्र एकूण उत्पादनाच्या २५ टक्के म्हणजे २ लाख ९७ हजार टन तूर खरेदीचे उद्दिष्ट ठेवले. तूर खरेदीसाठी नाफेड आणि एनसीसीएफची ७६४ खरेदी केंद्र सुरू केली. परंतु तरीही एकूण खरेदी उद्दिष्टाच्या केवळ ७७ हजार ५३ टन तुरीची सरकारी खरेदी करण्यात आली आहे. म्हणजे तूर खरेदी उद्दिष्टाच्या केवळ २६ टक्के ही खरेदी आहे. राज्य सरकारचा तूर खरेदीतला सावळा गोंधळ सुरुवातीपासून शेतकऱ्यांनी अनुभवला आहे. सोयाबीन खरेदीमुळे तूर खरेदीसाठी बारदाना आणि साठवण क्षमतेची उपलब्धता नसल्याचे कारण पुढे करण्यात आले. त्यामुळे तुरीची खरेदी उशिराने सुरू झाली. विविध जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी हमीभाव केंद्रावर तुरीची विक्री केली, त्या शेतकऱ्यांचे चुकारे वेळेत अदा करण्यात आले नाही. पान २ वर

### नोंदणी केलेले ८४ हजार शेतकरी खरेदीपासून वंचित

राज्यात तूर खरेदीसाठी १ लाख ३७ हजार ४५८ शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली. परंतु नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ५२ हजार ९७१ शेतकऱ्यांकडून तुरीची खरेदी करण्यात आली. त्यामुळे अद्यापही नोंदणी केलेली ८४ हजार ४८७ शेतकरी तूर खरेदीपासून वंचित आहेत. म्हणजेच तूर खरेदीची नोंदणी केलेल्या तूर उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ३८ टक्के शेतकऱ्यांना हमीभावाने विक्री करता आल्याचं राज्य सरकारच्या आकडेवारीवरून उघड झाले आहे.

# भारताची रणनिती ठरली!

## तिन्ही सैन्य दलांच्या प्रमुखांसोबत बैठक, सीडीएस अनिल चौहान यांचीही उपस्थिती



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढत असून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, ८ मेच्या मध्यरात्री भारताने पाकिस्तानला दणका देत त्यांचे हल्ले परतवून लावले. त्यानंतर शुक्रवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारताच्या तिन्ही दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव, डीआरडीओ प्रमुख आणि लष्कर प्रमुख (सीडीएस) अनिल चौहान यांच्यासोबत एक बैठक घेतली.**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी घेतलेल्या या उच्चस्तरीय बैठकीत गुरूवारी रात्रभर झालेली कारवाई, देशातील सध्याची सुरक्षा परिस्थिती आणि इतर संभाव्य धोके, त्याला प्रत्युत्तर देण्याची तयारी यावर सविस्तर चर्चा झाली आणि सीमेवरील हालचाली आणि सैन्याच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. तसेच संरक्षण मंत्र्यांनी या बैठकीत देशात असलेल्या शस्त्रास्त्रांसह लष्करी उपकरणांची उपलबधता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या गतीचा पान २ वर

### पाककडून ३६ ठिकाणी ड्रोन हल्ला, दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू – परराष्ट्र मंत्रालय

पाकिस्तानने ८ आणि ९ मेला रात्रीच्या दरम्यान भारतीय वायु क्षेत्राचं अनेकदा उल्लंघन करून ३६ ठिकाणी ४०० ड्रोनचा वापर करून हल्ला केला, अशी माहिती कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी शुक्रवारी (दि.९) पत्रकार परिषदेत दिली. पाकिस्तानने भारतावरील हल्ल्यासाठी तुर्कीचे सिस गार्ड सोंगर ड्रोन वापरले. पाकिस्तानने जम्मू, पुंछ, राजौरी, अखनूर आणि उधमपुरमध्ये सशस्त्र हल्ले करून नियंत्रण रेषेवर गोळीबार केला. यामध्ये भारतीय लष्करातील काही सैनिक गंभीर जखमी झाले, अशीही माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. पाकिस्तानने धार्मिक स्थळांवर हल्ले केल्याचं परराष्ट्र सचिव म्हणाले. हल्ल्यामध्ये २ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### युद्ध कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही – मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड

भारत–पाकिस्तान लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (एआयएमपीएलबी) ने असे प्रतिपादन केले आहे की युद्ध हा कोणत्याही समस्येवर उपाय नाही असे सांगत देशांनी त्यांचे प्रश्न संवाद आणि राजनैतिक मार्गांनी सोडवावेत असे मत यावेळी व्यक्त केले. दहशतवाद आणि निष्पाप नागरिकांची हत्या ही गंभीर चिंतेची बाब आहे हे लक्षात घेऊन, इस्लामिक शिकवणी, जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त तत्त्वे आणि मानवी मूल्यांमध्ये दहशतवादाला अजिबात स्थान नाही. म्हणून, देशांनी द्विपक्षीय संवाद आणि चर्चेद्वारे त्यांचे प्रश्न सोडवावेत. युद्ध हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही विशेषतः अण्वस्त्रांच्या बाबत, भारत आणि पाकिस्तान युद्ध परवडू शकत नाही, असेही जारी केलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे.

### मुंबईचे मुरली नाईक शहीद; जत्रेसाठी गावी गेलेल्या आईचा टाहो



सीमारेषेवर तणावाचे वातावरण असून दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू आहे. पूँछ, उरी सेक्टरमध्ये पाकड्यांना भारतीय सैन्य दलाकडून चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे. मात्र, उरी सेक्टरमध्ये मुंबईतील मजूर बापाचा लेक जवान मुरली नाईक हे पाकिस्तान्यांशी लढताना शहीद झाले आहेत. त्यांच्या वीरमरणाचे वृत्त गावी येताच, कुटुंबीयांनी टाहो फोडला. आपला तरणाबांड लेक गमावल्यानंतर आईच्या डोळ्यातील अश्रूंनी अनेकांच्या काळजाचे पाणी पाणी झाल्याचे पाहायला मिळाले. मुरली नाईक शहीद झाल्याचे वृत्त समजताच त्यांच्या आंध्र प्रदेशातील मूळ गावी स्थानिकांनी मोठी गर्दी केली आहे. तर, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी देखील ट्विट करुन पान २ वर

### सुट्ट्या रद्द, प्रत्येक जिल्ह्यात मॉक ड्रिल -मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई । पतिनिधी

**राज्याने सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन आणि इतर अनेक विभागांमधील उच्च अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याबरोबरीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तयारीसाठी मॉक ड्रिल आयोजित करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.**

देवेंद्र फडणवीस यांनी सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्याचे पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस प्रमुख, गृह विभागाचे उच्च अधिकारी आणि विविध संस्था आणि विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. सध्याच्या तणावाच्या परिस्थितीवर प्रत्येक जिल्ह्यात एक वॉर रूम स्थापन करण्यात यावी, मॉक ड्रिल घ्यावेत असे निर्देश असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. ब्लॅकआउट दरम्यान रुग्णालयांमध्ये समन्वय यंत्रणा उभारावी. पान २ वर

## एसटीच्या नव्या बस चालणार हायब्रीड इंधनावर!

• राज्यात उभारले जाणार १० सीएनजी पंप : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती



मुंबई । प्रतिनिधी

एसटी महामंडळ दरवर्षी ५ हजार याप्रमाणे पुढील ५ वर्षांमध्ये २५ हजार बसेस घेण्यात येणार आहेत. सन.२०२५-२६ पासून उर्वरित २० हजार बसेस या पर्यावरण पूरक अशा सी.एन.जी. व एल.एन.जी. सारख्या इंधनाबरोबर डिझेल इंधन हायब्रीड करून चालणाऱ्या असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाईल, जेणेकरून बस प्रवाशांची गैरसोय होणार नाही,अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ते पर्यावरण पूरक इंधनासंदर्भात बोलावलेल्या एसटी अधिकारी व संबंधित इंधन पुरवठादार संस्थांच्या बैठकीमध्ये बोलत होते.

ते म्हणाले, एसटीकडे बहुतेक सर्व बसेस डिझेल इंधनावर चालणाऱ्या आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४% खर्च हा इंधनावर होतो. दररोज सुमारे १० लाख ७० हजार लिटर इतके डिझेल लागते. वर्षाला सुमारे ३४ हजार कोटी रुपये इंधनावर खर्च होतात. भविष्यात डिझेल इंधनाची उपलब्धता व वारंवार होणारा दरातील बदल लक्षात घेता, पान २ वर

## दोन आठवड्याच्या आत आत्मसमर्पण करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

### माजी उपसभापती सुशिल साळुंकेने सर्वोच्च न्यायालयातील जामिन अर्ज काढला

माजलगाव । प्रतिनिधी

**येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार सोळंके याचा जामिन अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल होता.परंतु सर्वोच्च न्यायालयात उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश कायम होत असल्याने आरोपी सुशिल सांळुके यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला जामीन अर्ज परत घेतलेल्या अर्जावर सर्वोच्च न्यायालयाने आरोपी सुशिल साळुंके याने दोन आठवडयाच्या आत आत्मसमर्पन करुन न्यायालयात जामीन अर्ज दाखल करावा असे आदेश केला आहे.त्यामुळे पंचायत समिती माजलगावचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार साळुंके याची अटक आता अटळ झाली आहे.**



यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी अशोक बालासाहेब सोळंके याच्या फिर्यादीवरुन सुशिल साळुंके व इतर सहा आरोपीविरुध्द माजलगाव शहर पोलीस ठाणे माजलगाव येथे गुन्हा दाखल झाला होता.आरोपी सुशिल साळुंके याची आई सरपंच असून फिर्यादी व फिर्यादीच्या भावाने ग्रामपंचायत निवडणूकीत आरोपीच्या आई विरुध्द प्रचार केला होता तसेच फिर्यादीने ग्रामपंचायत कारभारा विरुध्द उपोषण केले होते. आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणावरुन सुशिल साळुंके व इतर ६ आरोपींनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन फिर्यादीला लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली होती.तसेच दुकानातील संगणक व इतर वस्तुंची मोडतोड करुन फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले होते. आरोपी सुशिल साळुंके याच्या विरोधात ग्रामस्थांना धमक्या देणे,मारहाण करणे अशा तक्रारी पोलीस स्टेशनला दाखल आहेत. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण करुन, पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.९ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.५० क्विंटल | २,६०० | २,८५१ | २,७४७ |
| ज्वारी/हायब्रिड :५३.०० क्विंटल | १,९५० | २,७०० | २,२८९ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : ५.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,३०१ | २,४५० | २,३६९ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ६३.५० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |

# पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले जाईल-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## तारकेश्वर गड येथील नारायण महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या कार्यक्रमास उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

**पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम भारत करत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेला हा घुसके मारेंगे वाला भारत आहे.**

आमच्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम या दहशतवाद्यांनी केलं त्यासाठी ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले त्याचे मी स्वागत करतो.. पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम आमचे जवान करत आहेत या दरम्यान महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाले त्यांना मी आदरांजली वाहतो असे म्हणत, केंद्राच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे महाराष्ट्रात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी बैठक झाल्याची देखील एकनाथ शिंदे यांनी सांगितले. बीडच्या तारकेश्वर गड येथे संत नारायण बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस, जिल्हाप्रमुख अनिल जगताप सचिन मुळूक यांची प्रमुख उपस्थिती होती.. गडाच्या विकासासाठी आवश्यक ती मदत आपण करणार असल्याचा शब्द देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज यांना दिला. कार्यक्रमासाठी गडावरील हेलिपॅड वर त्यांचे आगमन झाले त्यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.



cmyk

## अग्रलेख

# पाकिस्तान पूर्णपणे एकाकी !

'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केवळ एक लष्करी कृती नव्हे, तर भारताच्या दृढ इच्छाशक्तीची आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील सजगतेची ठोस ओळख आहे. या ऑपरेशनने पाकिस्तानला न केवळ अद्दल घडवली तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताच्या निर्णायक नेतृत्वाची छाप उमटवली. पाकिस्तानने गत काही वर्षांत सातत्याने भारतविरोधी कारवायांमध्ये सहभाग घेतला आहे. सीमारेषेवर घुसखोरी, दहशतवादाला खतपाणी घालणे आणि शस्त्रसज्ज कट रचणे हे सारे प्रकार वारंवार भारताच्या संयमाची परीक्षा घेत होते. मात्र 'ऑपरेशन सिंदूर'ने अशा कुकर्मांना सडेतोड उत्तर दिले आहे. या ऑपरेशनची अचूक योजना, गुप्तचर विभागांची कार्यक्षमता आणि लष्कराची धारदार कारवाई या साऱ्या गोष्टींनी यशाला चार चाँद लावले. हे केवळ शस्त्रबळाचे प्रदर्शन नव्हते तर एक स्पष्ट संदेश होता. भारत आपल्या सार्वभौमत्वावर कोणताही आघात सहन करणार नाही. या कारवाईमुळे पाकिस्तानला मोठा मानसिक आणि सामरिक धक्का बसला आहे. त्यांच्या मोहिमांची दिशा भांबावली, भरकटली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची विश्वासार्हता आणखी ढासळली आहे. या घटनेने इतर देशांनाही भारताच्या सुरक्षाविषयक दृष्टिकोनाची जाणीव करून दिली आहे.

आपल्या सैनिकांचे धैर्य, केंद्र सरकारचे ठाम नेतृत्व आणि जनतेचा लष्करावर असलेला विश्वास हे सारे घटक 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचे खरे शिल्पकार आहेत. भारत शांतताप्रिय देश असला तरी त्याच्या संयमाची परीक्षा घेणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्यायला तो सदैव तयार आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे त्याचेच एक सशक्त उदाहरण आहे. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी ज्याप्रकारे भ्याड आणि अमानुष हल्ला करून निरपराध पर्यटकांची हत्या केली ते पाहता त्याचे प्रत्युत्तर देणे भारताला भाग होते. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे ते काम चोखपणे पार पाडण्यात आले. भारताच्या हवाई दलाने जैश-ए -मोहम्मद, हिजबूल मुजाहिद्दीन आणि लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनांची मुख्यालये आणि प्रशिक्षित केंद्रे उद्ध्वस्त केली. भारतीय भूमीतून पाकिस्तानच्या सीमेत कुठेही दडून बसलेल्या दहशतवाद्यांना लक्ष्य करणे भारतासाठी कठीण नाही हा संदेश या निमित्ताने गेला हे महत्त्वाचे आहे. या हल्ल्यानंतर पाकने सुरू केलेला कांगावा पाहता पाकिस्तान हा किती कर्मदरिद्री देश आहे, हे स्पष्ट करण्याची एकही संधी पाकिस्तानी राज्यकर्ते सोडत नाहीत हे पुन्हा एकदा दिसून आले. खरे तर दहशतवाद पोसणारा पाकिस्तान त्याची विषारी फळे चाखत जगभर बदनाम झाला आहे. सध्या तो पूर्णपणे एकाकी पडला आहे.

दहशतवाद्यांनी पाकिस्तानी राज्यकर्त्यांना वेठीस धरले आहे. जोपर्यंत पाकिस्तान या दहशतवाद्यांच्या मुठीत स्वत:ला सुरक्षित समजत आहे तोपर्यंत त्या देशाला भवितव्य नाही हे ओळखून पाकिस्तानने स्वत:च दहशतवादाविरोधात लढाई सुरू करणे हेच शहाणपणाचे लक्षण ठरेल. पण भारत द्वेषाने आंधळ्या झालेल्या पाकिस्तानकडे तितकी नीतिमत्ताच शिल्लक राहिलेली नाही. भारताचा तिरस्कार करणारा पाकिस्तान आणि तेथील जनता एका वेगळ्याच आभासी जगात वावरत आहेत. २०१९ मध्ये भारताने बालाकोटजवळील दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला होता. वास्तविक त्या हल्ल्यानंतर पाकिस्तानने धडा घेत भारताच्या हातात हात घालून दहशतवादाविरोधात संघर्ष सुरू केला असता तर ते दोन्ही देशांसाठी हितकारक झाले असते. पाकिस्तानलाही विकासाच्या वाटेवर वाटचाल करता आली असती पण.. कुत्र्याचे शेपूट वाकडेच राहणार हेच पाकने दाखवून दिले आहे.

# शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व गावांनी पुढे यावे-जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ

जालना । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाच्या'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नालाखोलीकरण व रुंदीकरण' या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा प्रचाररथाद्वारे प्रचार-प्रसार तथा जनजागृती केली जात आहे. या प्रचाररथांना राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा, तालुका पातळीवर मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, झेडपी सीईओ जगदिश मनियार,जलसंधारण अधिकारी सुंदर वाघमारे,सर्व गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्रामसेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पीपीटी सादरीकरण या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे. जिल्हाधिकारी सरांच्या शुभहस्ते प्रचाररथाचे उद्घाटन करुन जलरथाद्वारे यायोजनेची माहिती जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गावांमध्ये देण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपरोक्त योजनांसाठी शासनाने आर्थिक नियोजन केले असून आपल्या परिसरातील सर्व जलसाठ्यातील गाळकाढण्यासाठी ग्रामपंचायत किंवा सेवाभावी संस्था पात्र आहेत. आपलेगाव जलआत्मनिर्भर करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत अर्ज मागविण्यात येत असुन आपलेगाव पाणीदार करण्यासाठी शासनाच्या वरील योजनेचा लाभ घेऊन गावाच्या तलावातील, नालाखोलीकरण करुन गाळ काढुया आणि आपलेगाव जल आत्मनिर्भर बनवूया, अशीसादत्यांनी गावकऱ्यांना घातली.यायोजनेची माहिती गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार यापोर्टलवर उपलब्ध असुन, मागणी अर्ज डाउनलोड करुन अर्जात संपूर्ण माहिती नमुद करुन ते अर्ज संबंधित अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीसह फोटो कॉपी संबंधित लिंकवर अपलोड करावी असे ते म्हणाले.**



आतापर्यंत या योजनेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या प्रचार रथाचे उद्घाटन राज्यातील २६ जिल्ह्यात संपन्न झाले. यात अहिल्यानगर, अकोला, भंडारा, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जळगाव, जालना, नंदुरबार, सांगली, सातारा, सोलापूर, वाशिम, यवतमाळ, धुळे, वर्धा,अमरावती, धाराशीव, गडचिरोली, लातूर, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर, परभणी, चंद्रपुर आदी जिल्ह्यांचा समावेश आहे. 'योजनेची सर्व माहिती तसेच अर्ज करण्यासाठी 'गाळमुक्त धरण' म्हणजेच '..' या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी.डिमांड जनरेशन या टॅबवरुन मागणी अर्ज डाउनलोड करून भरलेला अर्ज 'बीजेएस ॲप'वर अपलोड करावा. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा,'असे आवाहनमृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच सचिव गणेश पाटील यांनी केले आहे. सदरील योजनेद्वारे शासन गावागावांतील तलावांमधील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.

# आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना 'सस्ती अदालत' देणार जलद गतीने न्याय-तहसिलदार वैशाली पाटील



### अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रे

संबंधित रस्त्याचा गाव, सव्र्व्हे नंबर / गट नंबर, अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांची नावे, गट नंबर आणि शक्य असल्यास त्यांचा मोबाइल क्रमांक,मागणी केलेल्या रस्त्याचा सव्र्व्हे नंबर/गट नंबर, रस्ता वहीवाटीचा आहे का, गाव नकाशावर किंवा सातबाऱ्यावर नोंद आहे का,याची माहिती,गाव नकाशाची उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडील प्रमाणित प्रत,रस्ता केव्हा अडवला गेला,याचा तपशील,गैर अर्जदारांची नावे आणि पत्ते, सातबारा उतारा, फेरफार नक्कल आणि संबंधित कागदपत्रे, रस्त्याशी संबंधित प्रकरण कोणत्या न्यायालयात प्रलंबित आहे, किंवा न्यायालयाचे आदेश आहेत का, याची माहिती द्यावी.अशी माहिती नायब तहसीलदार बाळदत्त मोरे यांनी दिली आहे.

आष्टी । प्रतिनिधी

**महसूल मंत्री मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार आणि छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या परिपत्रकानुसार बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील शेत रस्ते,पाणंद रस्ते आणि शिव रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी शुक्रवार ९ मे रोजी आष्टी तालुक्यातील १० मंडळात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत 'सस्ती अदालत' घेण्यात आली असल्याची माहिती आष्टी तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे.**

### अर्ज करण्याची सुविधा

सस्ती अदालतीत आष्टी तालुक्यातील आष्टी, कडा, धामणगांव, दौलावडगांव, धानोरा, पिंपळा, आष्टा (ह.ना.), टाकळसिंग, दादेगांव, डोईठाण या १० महसूल करण्यात आली आहे. तसेच ही सस्ती अदालत दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी आयोजित करण्यात येणार आहे.

**-वैशाली पाटील,तहसिलदार आष्टी**

शेतकऱ्यांना जलद न्याय मिळावा आणि प्रलंबित प्रकरणांचा तातडीने चा निपटारा व्हावा,यासाठी राज्य शासनाने सस्ती अदालत हा उपक्रम सुरू केला असून,या अदालतीची सुरुवात आज शुक्रवार (दि.९) रोजी तालुक्यातील १० महसूल मंडळात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणाऱ्या सस्ती अदालतीद्वारे शेतकऱ्यांचे रस्ते समुपदेशकाने व सामंजस्याने मोकळे करण्यात येणार असून, गावातील वाद हे गावातच मिटावे यासाठी प्रयत्न करणार आहोत.यासाठी दोन नायब तहसिलदार यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आले असून सामान्य शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळावा,यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.जास्तीत-जास्त शेतस्त्यांचे अर्ज निकाली काढणार असल्याचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### सरकारकडून उद्दिष्टाच्या केवळ

तर दुसरीकडे केंद्र सरकारच्या तूर आयातीच्या धोरणामुळे खुल्या बाजारात तूर दरावर दबाव पाहायला मिळाला. परिणामी बहुतांश शेतकऱ्यांना खुल्या बाजारात हमीभावापेक्षा कमी किंमतीत तुरीची विक्री करावी लागली. केंद्र सरकारने २०२४-२५ च्या हंगामासाठी तुरीला ७ हजार ७५० रुपये प्रतिक्विंटलचा हमीभाव जाहीर केला आहे. परंतु सध्या खुल्या बाजारात तुरीला प्रतिक्विंटल ७ हजार ते ७ हजार ४०० रुपयांचा दर मिळत आहे. त्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामात आर्थिक तोटा सहन करावा लागला.

-----------

### सुट्ट्या रद्द, प्रत्येक जिल्ह्याती

त्याचप्रमाणे, अशा वेळी बॅकअप पॉवर स्टँडबाय ठेवावी. बाहेरून प्रकाश दिसू नये यासाठी गडद पडदे आणि खिडक्यांचे काचेचा वापर करावा, असेही निर्देश मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. खोट्या बातम्या पसरवणाऱ्या आणि शत्रूला मदत करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार आहे. तसेच पाकिस्तानला कोण मदत करत आहे हे शोधण्यासाठी सायबर गुन्हे विभागाने प्रत्येक जिल्ह्यातील सोशल मीडिया हँडलवर लक्ष ठेवले अपेक्षित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीनंतर बोलताना सांगितले. तसेच पोलिसांना कोम्बिंग ऑपरेशन आणि बंदोबस्त वाढवण्याचे निर्देश देण्यात आले असून सैन्याच्या तयारीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणाऱ्या आणि सोशल मीडियावर दृश्ये शेअर करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, असे देखील फडणवीस म्हणाले.

**महाराष्ट्रात 'हाय अलर्ट'; महत्वाच्या ठिकाणी सुरक्षा वाढवली**

मुंबई आणि इतर महत्वाच्या शहरांवर दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील महत्वाची धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, रेल्वे स्थानकांवर सुरक्षा वाढविण्यात आली. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे मुंबई पोलिसांनाही दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी मुंबई पोलिसांच्या सुट्ट्याही रद्द करण्यात आल्या आहेत. केंद्रीय गृहविभागाने सर्व राज्यांना सूचना केल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापन विभागाला तयार राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच महत्वाच्या धार्मिक स्थळे, महत्वाची इतर ठिकाणे, रेल्वे स्थानकांवर सुरक्षा वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

-------------

### भारताची रणनिती

आढावा घेण्यात आला. सीमेवर आणि सिमावर्ती भागात असलेल्या परिस्थितीवर संरक्षण रणनीतीच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जाते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी सांगितले की, भारत कोणत्याही सीमा आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यात अडथळा बनू देणार नाही आणि त्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे. त्यापुर्वी बुधवारी रात्री उत्तर आणि पश्चिम भारतातील १५ ठिकाणी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानी लष्कराचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले उधळून लावले आणि लाहोरमध्ये पाकिस्तानी हवाई संरक्षण प्रणाली निष्क्रीय केली होती.

-------

### मुंबईचे मुरली नाईक शहीद;

श्रद्धांजली वाहिली आहे. मुरली नाईक हे मूळचे आंध प्रदेशातील, पण त्यांचे वडिल जगण्यासाठी मुंबईत आले. मुंबईतील घाटकोपर भागात मजुरीचे काम करुन त्यांनी लेकाला सैन्य दलात भरती होण्यापर्यंत शिक्षण दिले. भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर आज त्यांच्या २३ वर्षीय मुलाला वीरमरण आले.

-------------

### दोन आठवड्याच्या आत

धमकावुन त्यांना मारहाण करण्याच्या घटनेसंदर्भात सुशिल साळुंके याच्याविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. सुशिल साळुंके याची गुन्हेगारी पार्श्वभुमी व प्रथमदर्शनी गुन्हयातील सहभाग या कारणास्तव उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता.अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी सुशिल साळुंके याने सर्वोच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केली होता.तथापी सर्वोच्च न्यायालयात, उच्च न्यायालयातीलच आदेश कायम करण्यात येत असल्याने आरोपीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला जामीन अर्ज काढून घेतलेल्या अर्जावर आरोपीने दोन आठवडयाच्या आत आत्मसमर्पण करुन न्यायालयात जामीन अर्ज दाखल करावा व असा जामीन अर्ज दाखल केल्यास न्यायालयाने तो गुणवत्तेच्या आधारावर तो निकाली काढावा असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे आरोपी सुशिल साळुंके याची अटक आता अटळ झाली आहे.

-----------

### एसटीच्या नव्या बस

पर्यायी इंधन वापरणे आवश्यक आहे. सी.एन.जी. आणि एल. एन. जी. हे पर्यायी इंधन प्रकार तुलनेने डिझेलपेक्षा स्वस्त असून पर्यावरण पूरक देखील आहेत. तसेच या इंधनाची कार्यक्षमता चांगली असल्याने बस प्रति लीटर ५-५-५ किलोमीटर अंतर कापते. डिझेल इंधनावर मात्र बस प्रति लिटर केवळ ४ किलोमीटर अंतर कापते. सहाजिकच एल. एन.जी व सी एन.जी. इंधन वापरल्यास इंधनावरील खर्चात बचत होऊन प्रदुषण कमी होण्यास मदत होणार आहे. पुढील वर्षीपासून घेण्यात येणाऱ्या नव्या २० हजार बसेस हायब्रीड इंधनावर चालणाऱ्या घेण्यात येणार आहेत.

**एल.एन.जी. इंधनावर २०% सुट**

एसटी महामंडळाने यापूर्वी किंग्ज गॅस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी सोबत केलेल्या करारानुसार एल.एन.जी.इंधन हे तत्कालीन डिझेल इंधनाच्या किमतीच्या २०% कमी दराने पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्याच्या खर्चात दरवर्षी २३५ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

**राज्यात उभारणार ९० सीएनजी पंप**

राज्याभरात ९० ठिकाणी एल.एन.जी. चे पंप उभारले जाणार आहेत. तसेच महानगर गॅस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे सी.एन.जी. चे २० पंप उभारले जात आहेत. त्यामुळे भविष्यात इंधन पुरवठ्याची व्यवस्था होणार असून या दोन्ही इंधनासोबत डिझेल इंधनावर चालेल, अशी हायब्रीड बस तयार करण्याचे प्रस्ताव बस मॅन्युफॅक्चर कंपन्याकडून मागविण्यात आले असून भविष्यात एसटीच्या तफ्यात या दोन इंधनावर चालणाऱ्या हायब्रीड बसेस घेण्याचा एसटीचा मानस असल्याचे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

## पान ६ वरून...

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी

करून घ्या., पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा., सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा., सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या, नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा., शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या, सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

---------------

### डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा

राजकुमार पोकळे, गौरव राजे निंबाळकर, अंबादास पोकळे, अनेक ग्रामस्थ, मित्रपरिवार, रामकृष्ण हॉस्पिटलचे डॉ.संदीप हंबर्डे, डॉ.सायंबर तसेच पुणे, मुंबई, श्रीरामपूर, मराठवाड्यातील अनेक मान्यवर आणि कवी, साहित्यिक उपस्थित होते.

------------

### युद्धजन्य परिस्थितीमध्ये

बीड शहराध्यक्ष प्रा. जगन्नाथ चव्हाण, शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी आदी अभाविप कार्यकर्ते उपस्थित होते.

------------

### रस्ते प्रकरणात सस्ती अदालत

नरोटे यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन सस्ती अदालत च्या माध्यमातून दोन्ही पक्षकार शेतकऱ्यांच्या सहमतीने व सामंजस्याने रस्त्याचे प्रकरण निकाली काढले असे पण सांगण्यात आले. गट क्रमांक १९४ मौजे टाका येथील अंबादास गायकवाड यांचा दोन वर्षांपूर्वीपासूनचा रस्त्याचा वाद अर्जदार वगैरे अर्जदार यांच्यामध्ये समझोता करून जाग्यावर मिटवला. सस्ती आदालत यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा वाचतो आणि आपापसातील संबंध हे सुमधुर राहतात.त्यामुळे गावातील वातावरण सुद्धा प्रेमाचे राहतात. म्हणून सदर मोहिमेचा फायदा सर्व लोकांना होत असल्यामुळे सर्व लोकांनी आपापली रस्त्याचे प्रकरणे सस्ती अदालत या मोहिमेच्या माध्यमातून निकाली काढून घ्यावेत असे आवाहन करण्यात येत आहे. अंबड तालुक्यातील मोहीम यशस्वी करण्यासाठी विजय चव्हाण तहसीलदार अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार महसूल महेंद्र गिरगे, गजानन महानोर, भागवत देशमुख इत्यादींनी कामकाज हाताळले

------------

### संत गजानन महाराज मंदीरात

मुर्तीबरोबरच समर्थ रामदास स्वामी, आणि महादेव मुर्तीची प्राणप्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. दि. ७ ते ९ मे या कालावधीत झालेल्या मुर्ती प्रतिष्ठाणा सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्र म आयोजित करण्यात आले होते.मंदीरात बसविण्यात आलेली गणेशाची आणि दत्त गुरूंची मुर्ती अप्रतिम असून विविध कथा आणि पुराणाचा अभ्यास करून ही मुर्ती बनविण्यात आल्याने देशातील एकमेव मुर्ती ठरणार असल्याचे यावेळी मंदीर समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

-------------

### वाळू माफियावर कारवाई १०

वाळु असा एकुण १०,०६,०००/- रुपयेचा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आलेला आहे. याबाबत अंबड पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २४५/२०२५ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या. सं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी मा.श्री अजय कुमार बंसल पोलीस अधिक्षक , मा.श्री अयुष नोपाणी अपर पोलीस अधिक्षक , यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंबड प्रभारी अधिकारी अमोल गुरले सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनि ठुबे, पो.ह.२६२/ रविंद्र चव्हाण, पो.ह. ११७७/हरकळ, पो.शि १२९४/पांढरे, पो.शि १६३२ भांगळ, पो.शि. ६२६/भानुसे यांनी पार पाडलेली आहे.

--------------

### ऑपरेशन सिंदूरचा बीड

आहे. हा दिवस आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी भारत माता की जय, वंदे मातरम्? अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

----------------

### बीकेसी ते आचार्य अत्रे चौक

कामे वेगाने सुरू आहेत. आतापर्यंतच्या मेट्रोला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. अंतिम टप्पा सुरू झाल्यानंतर कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे या मार्गावर प्रवाशांना उत्तम कनेटिव्हिटी मिळेल. या मार्गावरील सर्व मेट्रो स्थानकेही अत्याधुनिक सुविधांनीयुक्त असून प्रत्येक स्थानकावर प्रवेशासाठी अनेक प्रवेश मार्ग असल्याने गर्दीचे योग्य व्यवस्थापन होईल. तसेच मेट्रो मार्ग हे प्रदुषणमुक्त व पर्यावरणपूरक आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई महानगर प्रदेशात मेट्रोची कामे मोठ्या वेगाने सुरू आहे. याद्वारे मुंबईकर तसेच महामुंबईतील नागरिकांसाठी सुलभ व अखंड परिवहन जोडणी (सिमलेस ट्रान्सपोर्ट सिस्टीम) यंत्रणा तयार करण्याचे काम सुरू आहे. यावर्षी ५० किमी तर पुढील वर्षी आणखी ५० किमी मेट्रोचे काम पूर्ण करण्याचा मानस आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**सिंगल प्लॅटफॉर्मवर सर्व सार्वजनिक परिवहन सेवा मिळणार**

मेट्रो, बेस्ट, लोकल या सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी सिंगल प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यातून प्रवाशांना एकाच तिकीटावर प्रवास करण्याची सुविधा मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात मुंबईत हा प्रयोग सुरू करण्यात येणार असून त्यानंतर महामुंबईतही ही सेवा देण्यात येणार आहे. सध्या यावर प्रायोगिक तत्वावर काम सुरू असून लवकरच त्याचा व्यावसायिक वापर सुरू होईल. यामुळे नागरिकांना मुंबई तसेच महामुंबई परिसरात सुलभपणे प्रवास करता येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. बेस्टने कालच गुगल सेवेबरोबर करार केला आहे. यापुढे बेस्टच्या बसेसचे रिअल टाईम लोकेशन गुगलवर मिळणार असून या ठिकाणी प्रवाशांना आपल्या प्रवासाचे नियोजनही करता येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**मेट्रो प्रकल्पामुळे मुंबईकरांना दिलासा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मुंबईकरांसाठी आजचा दिवस आनंदाचा आहे. मेट्रोमुळे मुंबईतील लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मेट्रोमुळे या मार्गावरील सुमारे चार ते पाच लाख वाहने कमी होणार आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर इंधन व वेळेची बचत होणार आहे. देशातील सर्वात मोठे मेट्रोचे जाळे मुंबईत उभारण्यात येत आहे. नागरिकांची गरज ओळखून कामे होत आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. मेट्रोची कामे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावरील ५० टक्के वाहने कमी होतील. त्यामुळे महामुंबईकरांसाठी मेट्रो प्रकल्प वरदान ठरणार आहे.

**कनेक्टिविटी**

बीकेसी, वरळी यांसारख्या बिझनेस हब्सना जोडले जाणार आहे. बीकेसी स्थानक मेट्रो मार्ग २ बी आणि बुलेट ट्रेनशी भविष्यात जोडले जाणार असून त्यामुळे प्रवासी संख्येत वाढ होणार आहे. सिद्धिविनायक मंदिर, माहीम दर्गा आणि माहीम चर्च यासारखी धार्मिक स्थळे तसेच शिवाजी पार्क, रवींद्र नाट्य मंदिर, शिवाजी मंदिर, यशवंत नाट्य मंदिर, प्लाझा सिनेमा यासारखी मनोरंजनाची ठिकाणे देखील या मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहेत.

------------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. १० मे २०२५



## केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जान असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या दीड दशकापासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा बिनकामाचा जनता दरबार

## पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग

बीड। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले शेतकरी पवनचक्की कंपन्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक आणि पोलिस प्रशासनाची दडपशाही या विरोधात न्याय मागण्यासाठी दि.८ गुरूवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील जनता दरबारात न्यायाच्या प्रतिक्षेत असताना जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या जिल्हाधिकारी यांनी त्यांना न्याय देण्यास असमर्थता दर्शवली व पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दाद मागा मी यात काहीही हस्तक्षेप करू शकत नाही अशी हतबलता दर्शविल्याने अखेर शेतकऱ्यांनी आपली नाराजी दर्शवली व हा तर जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी



ऐकल्या जातील व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल असा बीडकरांना विश्वास दिला.याविषयी भरपूर दैनिकातुन प्रसिद्धीही झाली. त्यामुळे वारंवार तक्रारी करूनही समस्या न सुटलेल्या नागरीकांना जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून आपले गा-हाणे मांडुन आपले प्रश्न सुटणार अशा आशा पल्लवित झाल्या होत्या मात्र त्या फोल ठरल्याची प्रतिक्रिया पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी दिली आहे.

जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित विषयांच्या अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले जातील आणि जिल्ह्यधिकारी यांनी आदेश दिल्याने आपल्या समस्या मार्गी लागतील अशी भावना असते.त्यामुळे तक्रारदार नागरीकांचे निदान समाधान तरी होते. दि.०७ मे बुधवार रोजी सकाळी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांना मावेजा न देताच शेतातुन विद्युत तारा ओढण्याचे काम पोलिस बंदोबस्तात जबरदस्तीने होत होते.याला शेतकऱ्यांनी विरोध केला त्यामुळे त्याठिकाणी काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे हे सुद्धा शेतकऱ्यांच्या विनंती वरून घटनास्थळी पोहोचले. त्यांना शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांनी आर्थिक फसवणूक केली असुन मावेजा न देणे,कमी जास्त मावेजा देणे, न वटणारे धनादेश देणे व मावेजा मागितल्यावर पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले.

याविषयी उपस्थित पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके पाटोदा पोलिस स्टेशन यांच्याशी डॉ.गणेश ढवळे यांनी व शेतकऱ्यांनी संवाद साधला असता. सशुल्क पोलिस संरक्षण मागितल्याने आमची कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये हि आमची जबाबदारी असुन मावेजा मिळणे,काम थांबविणे आमच्या हातात नसुन तुम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून काम थांबविण्याचे आदेश आणा असे सांगितले. त्यानंतर पाचेगाव येथील १० शेतकरी यांनी दुपारी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली.जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी अथवा तहसीलदार यांच्याशी फोनवरून सुचना न देताच आल्या पावली घरी पाठवले. त्यामुळे आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार भरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

# खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेऊनच करावे-आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

येथील पंचायत समिती कार्यालयात माजलगाव,वडवणी व धारूर तालुक्यातील खरीप पूर्व हंगाम आढावा बैठक दि ०९ मे शुक्रवार रोजी घेण्यात आली.खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवावे ही महत्वपूर्ण सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी खरीप हंगाम आढावा बैठकीत करण्यात आली.

खरीप हंगाम २०२५ च्या अनुषंगाने प्रशासनाकडून तीस कलमी कार्यक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये खरीप हंगाम सभेचे नियोजन,माती परीक्षण मोहीम व जमीन आरोग्य पत्रिका



वाटप,बीज प्रक्रिया मोहीम,घरगुती चाचणी पद्धतीने बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक मोहीम,क्रॉपसॅप व हॉर्टसँपसाठी शेतकरी निवड व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण,शेतीशाळा नियोजन,प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गांवनिहाय प्रशिक्षण मोहीम,जमीन सुपीकता निर्देशकांच्या आधारे खतांचा वापर,आपत्कालीन पिक नियोजन,महाडीबीटी प्रणालीवर अर्ज वाढविणे कृषि निविष्ठाच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम,पुरस्कारासाठी शेतकरी निवड,बीबीएफ / मुलस्थानी जलसंधारण/पट्टापेर पद्धत,हिरवळींच्या खतांचा निर्मिती व वापर,बायोचार निर्मिती बाबत शेतक्याना अवगत करणे,फळबाग लागवडीसाठी सीआरए तंत्राचा वापर,यशोगाथा संकलन मोहीम,कृषी विषयक माहिती व तंत्रज्ञानांची साधने याबाबत माहिती देणे अशी विविध तीस कलमांचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन खरीप हंगामाचे नियोजन करण्यात येणार आहे.खत आणि बियाणे पुरवठा संबंधी योग्य नियोजन करावे.याबाबतीत शेतकऱ्यांची हेळसांड होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना आ.सोळंके यांनी प्रशासनास दिल्या.कर्जवाटपा बाबत उद्दिष्ट पूर्ण करत असताना,जुन्या शेतकऱ्यांसह नवीन शेतकऱ्यांना विचारत घेऊन पीक कर्ज देण्याबाबत आराखडा तयार करून नवीन शेतकऱ्यांना पीक कर्जाचा लाभ देण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावेत.पिक कर्ज वाटपाबाबत स्वतंत्र आढावा बैठक घेण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना ही यावेळी आ.प्रकाश सोळंकें यांनी दिल्या.

## बीड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशनचा ढोंगीपणा उघड




पाटोदा । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या ‘‘स्वच्छ भारत मिशन‘‘अंतर्गत देशभरात स्वच्छता अभियान राबवले जात असतानाही प्रत्यक्षात या मोहिमेची अंमलबजावणी कागदावरच मर्यादित राहिल्याचे धक्कादायक चित्र पाटोदा तालुक्यात समोर आले आहे. पाटोदा पंचायत समिती कार्यालयात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक सुरू असताना कार्यालय व परिसरात गुडघाभर कचऱ्याचे ढीग पडलेले होते.या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्याच्या स्वच्छतेबाबत प्रशासन किती गंभीर आहे, याचे वास्तव चव्हाट्यावर आले आहे. बैठकीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जे ठिकाण विकासाच्या निर्णयांचा केंद्रबिंदू आहे, तिथेच अशी अस्वच्छता असेल तर तालुक्याच्या इतर गावांमध्ये काय परिस्थिती असेल, हा प्रश्न उपस्थित होत असून गावोगावात कचरा, पण व्यवस्था कुठे?

पाटोदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये नियमित कचरा संकलन होत नाही. कचरा कुजत असल्यामुळे दुर्गंधी, डास, आणि साथीचे रोग पसरत आहेत. स्थानिक स्वच्छता कर्मचारी अपुरे असून, पाण्याचीही सोय नसल्याने सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे दुरापास्त झाले आहे.कोट्यवधींचा खर्च, पण परिणाम कुठे?

जिल्हात दिसत असून स्वच्छ भारत मिशनसाठी सरकारी निधीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. मात्र, हा निधी प्रत्यक्ष कामांमध्ये दिसून येत नाही.‘‘सरकार आणि प्रशासनाची नजर केवळ बैठकीपुरती स्वच्छता दाखवण्यात आहे का?‘‘ असा सवाल पाटोदा तालुक्यातील नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकारांनाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे,अशी मागणीही पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी केली आहे



बीड : वीर शिरोमणी महाराणाजी प्रताप यांच्या ४८५ जयंती निमित्ताने आदरांजली अर्पण करत असताना एडवोकेट युवराज बहिरवाल मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई कायदेशीर सल्लागार यांनी अभिवादन केले तसेच समाजातील महाराणा प्रताप यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य सामाजिक राजकीय व विविध स्तरातील मान्यवरांनी अभिवादन केले

## ब्रह्मगाव येथील जलजीवनचे काम सुरू करा

### अनिल राधे कांबळे यांचे उपोषण

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगाव येथील जलजीवन योजनेचे काम तात्काळ सुरू करा या मागणीसाठी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.

तालुक्यातील ब्रह्मगाव येथे पाणीटंचाईच्या तीव्र झाला जाणवत असून सध्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामस्थावर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. ब्रम्हगाव येथील जलजीवनच्या कामाचे टेंडर २२ डिसेंबर २०२३ मध्ये झाले असून दोन वर्षे झाले गावात पाणी नाही, नागरिकांचे पाण्यासाठी हालाहाल होत आहेत. त्यामुळे जलजीवांचे काम तत्काळ सुरु करावे, संबंधित गुत्तेदारावर गुन्हे दाखल करा या मागणीसाठी दि. ११/०४/२०२५ रोजी याबाबत सविस्तर





अर्ज मा. मुख्याधिकारी साहेब, जि.प.बीड यांना दिला होता, परंतू त्यांनी अद्यापही कसलीही कार्यवाही केली नसल्याने मी दि. ०७ मे २०२५ रोजी पासून जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपसरपंच अनिल राधे कांबळे व दशरथ काबळे यांचे वतीने उपोषण सुरू करण्यात आले आहे.

# माजलगावात रविवारी १६ वे शिवार साहित्य संमेलन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने घेण्यात येणारे १६ वे शिवार साहित्य संमेलन माजलगावातील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरातील प्राचार्य रा.रं. बोराडे साहित्यनगरीत रविवारी (दि. ११ मे) आयोजित करण्यात आले आहे.

सकाळी ९:०० वाजता श्री ह. भ. प. आदिनाथ महाराज कुंडकर यांच्या हस्ते ग्रंथ पूजन होणार आहे. सकाळी ९:३० वाजता या शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ .दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे नवनिर्वाचित सदस्य दगडू लोमटे, अनंत कराड , निमंत्रित सदस्य प्रभाकर साळेगावकर, मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन समिती सदस्य डॉ. योगिता होके पाटील यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी पूर्वाध्यक्ष अनिलकुमार साळवे, स्वागताध्यक्ष भारत होके यांची उपस्थिती राहणार आहे. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ हे करणार असून आभार शरद रांजवण मानणार आहेत.दुसऱ्या सत्रात सकाळी ११:०० वाजता प्रसिद्ध कथाकार गेणू शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होणार आहे. यामध्ये परभणी येथील प्रसिद्ध कथाकार अर्चना डावरे यांचा सहभाग आहे. या सत्राचे सूत्रसंचालन नारायण झोडगे हे करणार असून आभार विशाल वायाळ मानणार आहेत.

दुपारी २:०० वाजता ज्येष्ठ कवयित्री प्रतिभा थिगळे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार आहे. यामध्ये माजलगाव व परिसरातील कवींचा सहभाग राहणार आहे.या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन गोविंद गोचडे, गीता सोळंके हे करणार असून आभार मोहन राठोड मानणार आहेत. शिवार साहित्य संमेलनाचा समारोप दुपारी ४:०० वाजता होणार आहे. या सत्राचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध वात्रटिकाकार प्रा.सत्यप्रेम लगड हे आहेत.यावेळी संमेलनाध्यक्ष ना. मा.पडलवार यांची उपस्थिती राहणार आहे.समारोप सत्राचे सूत्रसंचालन खेलबा काळे हे करणारा असून आभार बालाप्रसाद चव्हाण हे मानणार आहेत.यावेळी विविध ठराव घेतले जाणार आहेत.या शिवार साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष भारत होके,मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,उपाध्यक्ष प्रा.स्नेहल पाठक, कार्यवाह प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर, सहकार्यवाह बालासाहेब झोडगे, प्रा.डॉ.उमेश साडेगावकर , कार्यकारिणी सदस्य प्रा.हिरामण डावरे, डॉ.अंगद गायकवाड,प्रा. संगीता जाधव, पुरुषोत्तम जाधव, प्रा.बालाजी बोडके, शरद रांजण निमंत्रित सदस्य डॉ. योगिता होके पाटील,गौरी देशमुख,डॉ.प्रज्ञा जोशी यांनी केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७५१/२०२५**

**ॲड. एस. आर. कुंभार यांचे मार्फत**

**शारदा व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी जगन्नाथ पि. हरिभाऊ राऊत हे दिनांक ०१.०२.२०२५ स्वराज्य नगर, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी, १. शारदा भ्र. जगन्नाथ राउत, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम रा. स्वराज्य नगर, बीड ता. जि. बीड २. वैजिनाथ पि. जगन्नाथ राउत, वय ४२ वर्षे, धंदा नौकरी रा. स्वराज्य नगर, बीड ता. जि. बीड, ३. अजित पि. जगन्नाथ राउत, वय ४० वर्षे, धंदा नौकरी रा. स्वराज्य नगर, बीड ता. जि. बीड, ४. रंजना भ्र. विजय नाईक, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. गजानन नगर, नाळवंडी, रोड, बीड ता. जि. बीड अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले असुन अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना /अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १०.०६.२०२५ ही आहे. आज दिनांक ०५.०५. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

स्वाक्षरित
**क लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, बीड

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

cmyk

# खरीप हंगामात अन्नधान्य उत्पादन वाढीचे उद्दिष्ट

## खतांचा पुरेसा साठा; केंद्रीय कृषी मंत्रालयाचा दावा

दिल्ली : केंद्र सरकारने खरीप हंगाम २०२५ मध्ये अन्नधान्य उत्पादन १६८.८८ दशलक्ष टनाचं उद्दिष्ट ठेवलं आहे. मागील वर्षी अन्नधान्य उत्पादनाचं उद्दिष्ट १६६.३९ दशलक्ष टन ठेवलं होतं. मागील वर्षीच्या तुलनेत मात्र आगामी खरीप हंगामात अन्नधान्य उत्पादन १.५ टक्क्यांनी अधिक राहील, असा कृषी मंत्रालयाने विश्वास व्यक्त केला आहे.

देशात आगामी खरीप हंगामासाठी खतांची पुरेशी उपलब्धता असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली आहे. गेल्यावर्षी रब्बी हंगामात देशाच्या विविध भागात खत टंचाईने शेतकऱ्यांची कोंडी केली होती. त्यामुळे खतांचा काळाबाजार झाला होता. कृषिमंत्री चौहान म्हणाले, ''खरीप हंगामासाठी आवश्यक खतांची पुरेशी उपलब्धता आहे, त्याची खातरजमा खत मंत्रालयाने केली आहे. परंतु खत सचिवांनी नॅनो युरिया आणि नॅनो-डीएपी यांचं क्षेत्रीय प्रदर्शन करावं. जेणेकरून पारंपरिक खतांचा वापर कमी करता येईल. २९ मेपासून दोन आठवड्याचे विकसित कृषी संकल्प अभियान सुरू करण्यात आहे. या अभियानामध्ये २ कोटी शेतकऱ्यांना जोडण्यात येणार आहे.'' असा दावाही चौहान यांनी केला. परंतु डीएपी खतांच्या मागणी आणि पुरवठ्यात ४.८ दशलक्ष टनांचं अंतर आहे. खरीप हंगामात देशाची डीएपी खतांची मागणी ५..७ दशलक्ष असून साठा मात्र ०.९ दशलक्ष टन आहे. देशात अन्नधान्य पिकांमध्ये भात महत्त्वाचे पीक आहे. केंद्र सरकारने खरीप हंगामात तांदळाच्या उत्पादनाचं उद्दिष्ट १२०.७५ दशलक्ष टन ठेवलं आहे. तर कडधान्य उत्पादनाचं उद्दिष्ट ७.७४ दशलक्ष टन ठेवण्यात आलं आहे. मागील वर्षी तांदळाचे बाजार भाव चांगले राहिले. त्यामुळे लागवडीखालील क्षेत्रातही वाढ झाली होती. तर केंद्रीय अर्थसंकल्पात कडधान्य मिशनची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगामात कडधान्य उत्पादनात वाढ होईल, असा कृषी मंत्रालयाचा दावा आहे. त्यामुळे खरीप हंगामात तुरीचे ३.७ दशलक्ष टन, उडीदचे १.५१ दशलक्ष टन आणि मुगाचं १.६२ दशलक्ष टन उत्पादन उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. परंतु कडधान्य आयातीमुळे खुल्या बाजारातील भाव हमीभावाच्या खाली राहिले. त्याचा कडधान्य उत्पादकांना मोठा फटका बसला. तसेच तेलबिया आणि कडधान्यांची खरेदी पुढील हंगामापासून ऑक्टोबर महिन्यापासूनच सुरू होईल, असंही



अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. खरेदीसाठी पॉइंट ऑफ सेल यंत्राच्या मदतीने बायोमेट्रिक फेस ऑथेंटिकेशनने पडताळून केली जाणार आहे. केंद्र सरकारनं खरेदी कालावधी ६० दिवसांपर्यंत मर्यादित केला आहे. तर गरज असेल त्यावेळी खरेदीला ३० दिवसांची मुदतवाढ दिली जाऊ शकते. परंतु,कोणतीही खरेदी ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी चालणार नाही, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. यावेळी शेवटच्या काळात खरेदीत अचानक वाढते, याकडे केंद्रीय कृषी सचिवांनी लक्ष वेधले. खरीप आणि रब्बी हंगामात बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो. यावर कृषिमंत्री चौहान यांनी केंद्र सरकार १९६६ च्या बियाणे कायद्यात सुधारणा करण्याचा विचार करत असल्याचं सांगितलं. ते म्हणाले, ''केंद्र सरकार बोगस बियाण्यांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी १९६६ च्या बियाणे कायद्यात सुधारणा करण्याचा विचार करत आहे. त्यासाठी सध्या एक मसुदा विधेयक तयार करण्यात येत असून, राज्यांकडून अभिप्राय मागवण्यात आला आहे.

दरम्यान, २९ मे ते १२ जून दरम्यान विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत सुमारे २ हजार पथक तयार करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात चार भारतीय कृषी संशोधन परिषदेचे वैज्ञानिक, स्थानिक कृषी कार्यालयाचे कर्मचारी आणि कृषी विज्ञान केंद्र यांचा समावेश राहील. तसेच एक पथक दिवसाला तीन सभा घेणार आहे. यामध्ये दररोज १०-१२ लाख शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. शेतकऱ्यांना अनुकूल बियाणे, खतांची उपलब्धता, मॉन्सून अंदाज आणि सरकारच्या योजना या विषयांची माहिती अभियानातून दिली जाणार आहे. त्यामुळे यामध्ये राज्य सरकारांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री चौहान यांनी केले आहे.

## 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे जलसंधारण आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी महत्त्वाचे पाऊल

मुंबई : राज्यातील जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि शेतीला पोषण देणारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतला 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व घडवते आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे धरणांत साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारांमध्ये करणे. परिणामी, जलसाठ्याची क्षमता वाढवली जाते आणि गाळातील पोषणमूल्ययुक्त माती शेतजमिनीत वापरून जमिनीची सुपीकता सुधारली जाते. ही योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त योजना :गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणे, बंधारे आणि तलावांमधील गाळ काढून त्या परिसरातील जमिनीवर टाकला जातो.शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढते आणि पाणी साठवण क्षमता देखील सुधारते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे मर्यादित संसाधने असतात, त्यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरामुळे थेट फायदा होतो. शासनाचा उद्देशही शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करणे व नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे हाच आहे. त्यामुळे ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी फारच उपयुक्त ठरत आहे. १ एप्रिल २०२४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२७४ एकूण ६६.९१ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, त्यापैकी ४२.२९ कोटी घनमीटर गाळाचे उत्खनन पूर्ण झाले असून, हे लक्ष्याच्या ६३ टक्के इतके आहे. ही भरघोस कामगिरी प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शक्य झाली आहे.

राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद :योजनेसाठी राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत १५४९.९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. यामध्ये ३५,२०५ शेतकऱ्यांपैकी ३१,७१९ शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरले असून, त्यांनी ३४.१७ कोटी घनमीटर गाळ काढला आहे. यासाठी १२२१.६ कोटी रुपयांचे अनुदान अपेक्षित असून, आतापर्यंत ५१२.४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.



## कोरडवाहू फळझाडांना द्या संतुलित खते



फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे.यापैकी खत व्यवस्थापनास अन्यन साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे.

फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्द्रव्यावर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते.त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात.झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त,खतांचा संतुलित पुरवठा,सेंद्रीय पदार्थांचे आछादन म्हणून वापर,आच्छादनाची पिके,आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चागली ठेवणे फायदेशीर ठरते.

फळ झाडांना खते देण्याची योग्य वेळ :सर्वसाधारणपणे फळझाडांना जून-जुलै, सप्टेबर-ऑक्टोबर व जानेवारीफेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्व होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत.सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत,संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

फळझाडांना खते देण्याची पद्धत :खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा.प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा. सिताफळ:पूर्ण वाढलेल्या (४ वर्ष +) झाडास ३० ते ४० किलो शेणखत,५५०:१२५:१२५ ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( ५५० ग्रॅम युरिया, ८०० ग्रॅम एसएसपी व २०० ग्रॅम एमओपी) प्रती वर्ष द्यावे.

नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.शेणखताबरोबर अ‍ॅझोस्पिरीलम व पीएसबी या जीवाणू खतांचा वापर करावा. बोर: पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत ५० किलो प्रती झाडास छाटणी नंतर द्यावे. २५:२५०:५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( अर्धा किलो युरिया, दीड किलो एसएसपी व एक किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे. आवळा:पूर्ण वाढलेल्या( ५ वर्ष व नंतर ) झाडास ५० किलो शेणखत ५००:२५०:२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड (१ किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे. जांभूळ:पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर) झाडास ५० किलो शेणखत ५००:२५०:२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड (१ किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

चिंच: पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर) झाडास ५० किलो शेणखत ५०० : २५० :२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( एक किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

कवठ: पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर) झाडास ५० किलो शेणखत ३५० : २५०: २५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश (पाऊण किलो युरिया, दीड किलो किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती झाड प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१८ : इंग्रज मराठे तह होऊन रायगड किल्ला इंग्रजांच्या ताब्यात

१८२४ : लंडनमधील नॅशनल गॅलरी सर्वसाधारण लोकांसाठी खुली करण्यात आली.

१८५७ : मिरज येथे पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची पहिली ठिणगी पेटली.

१९०७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाचा सुवर्णमहोत्सव लंडनमधे साजरा केला.

१९०९ : सावरकरांनी ब्रिटिशांच्या आनंदोत्सवाला प्रत्युत्तर म्हणून लंडनच्या इंडिया हाऊसमध्ये १८५७ च्या वीरांचा गौरव करणारा समारंभ आयोजित केला. त्यात त्यांनी आपल्या भाषणात त्या संघर्षाला उघड उघड स्वातंत्र्यसमर म्हटले.

१९३७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून बिनशर्त मुक्तता.

१९४० : दुसरे महायुद्ध हिटलरने हॉलंड, बेल्जिअम आणि फ्रान्सवर आक्रमण केले.

१९४० : दुसरे महायुद्ध नेव्हिल चेम्बरलेनने राजीनामा दिल्यावर विन्स्टन चर्चिल युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.

१९६२ : मार्वल कॉमिक्सने द इक्रीडिबल हल्क या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित केला.

१९७९ : मायक्रोनेशिया प्रजासत्ताक बनले.

१९८१ : फ्रान्सवा मितराँ फ्रान्सचे अध्यक्ष बनले.

१९८१ : मुंबईमध्ये प्रथमच रात्रीच्या वेळी पकाशझोतात क्रिकेट सामना खेळण्यात आला.

१९९३ : संतोष यादव हि दोनदा एव्हरेस्ट पर्वत सर करणारी पहिली भारतीय महिला ठरली.

१९९४ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांनी देशाची सूत्र हाती घेतली.

१९९७ : ७.३ मेगावॅट भूकंपाच्या तीव्र धक्क्याने इराण मधील सुमारे १५६७ लोक ठार, २३०० लोक जखमी आणि ५०००० लोक बेघर झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२६५ : जपानचा सम्राट फुशिमी यांचा जन्म. (मृत्यू: ८ ऑक्टोबर १३१७)

१८५५ : भारतीय गुरु आणि शिक्षक युकतेश्वर गिरी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९३६)

१८८९ : स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बंधू, कादंबरीकार नारायण दामोदर सावरकर यांचा जन्म.

१९०५ : गायक व संगीतकार पंकज मलिक यांचा जन्म. (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९७८)

१९०९ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर चे पहिले संचालक बेल्लारी शामण्णा केशवन यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०००)

१९१४ : चित्रपट निर्माते ताराचंद बडजात्या यांचा जन्म. (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९२)

१९१८ : रिसर्च अँड अ‍ॅनॅलेसिस विंग या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वरनाथ काओ यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी २००२)

१९३१ : ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबूडकर यांचा जन्म.

१९३७ : माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस, मराठी कवी

१९४० : प्रसिद्धी पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २६ मार्च २०१२)

१९८६ : बुद्धीबळपटू पेंड्याला हरिकृष्ण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७४ : फ्रान्सचा राजा लुई (पंधरावा) यांचे निधन. (जन्म: १५ फेब्रुवारी १७१०)

१८९९ : रँड वधाच्या प्रकरणी द्रविड बंधूंची हत्या केल्याबद्दल महादेव विनायक रानडे यांना फाशी.

१९८१ : विनोदी लेखक प्राध्यापक विमादि तथा विनायक माधव दीक्षित पटवर्धन यांचे निधन.

१९९८ : पत्रकार, समाजसेवक, लेखक, चरित्रकार, साधना मासिकाचे संपादक यदुनाथ दत्तात्रय थत्ते यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)

२००० : कवी नागोराव घन:श्याम तथा ना. घ. देशपांडे यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९०९)

२००१ : महाराष्ट्राचे १३ वे मुख्यमंत्री, हिमाचल प्रदेशचे राज्यपाल सुधाकरराव नाईक यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९३४)


२००२ : गीतकार सय्यद अख्तर हुसेन रिझवी ऊर्फ कैफी आझमी यांचे निधन. (जन्म: १४ जानेवारी १९१९)

२०१५ : भारतीय इतिहासकार, लेखक निनाद बेडेकर यांचे निधन. (जन्म: १७ ऑगस्ट १९४९)

## वाढत्या तापमानात पपई, पेरु बागेची काळजी

जास्त तापमानामुळे पपई ची पानं करपण, फळावर चट्टे पडण, फळातील गर खराब होऊन फळे पिवळी पडून गळतात. तर पेरुच्या आंबे बहरातील फळांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. पपई पिकाला सरासरी २२ ते २६ अंश सेल्सिअस तापमान मानवत. पण तापमानाचा पारा ४० च्या वर गेल्यास जमिनीतील तापमानामुळे उष्णतेचा परिणाम मुळांवर होतो. त्यामुळे मुळे खराब होतात. मुळांच अन्नद्रव्य आणि पाणी शोषण करण्याचं काम मंदावत. फळांचा आकार लहान राहतो आणि फळाच्या गरामध्ये साका तयार होतो. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होते.

वाढलेल्या तापमानामुळे पपई झाडावर पांढरी माशी, तुडतुडे या रसशोषक किडी आणि काही विषाणूजन्य रोगही पडतात. त्यामुळे पानांचा रंग हिरवट पिवळसर होतो. पानांवर सुरकुत्या पडतात. जास्त प्रादुर्भावामध्ये फळावर पिवळे चट्टे पडतात. त्यामुळे फळांची प्रत खालावते.पपई बागेत जर अशा समस्या येत असतील तर, बागेला ठिबक सिंचनाद्वारे शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावं. झाडाच्या खोडाच्या चारही बाजूंनी शेतातील उरलेल्या काडीकरचऱ्याचं आच्छादन कराव. आच्छादनाचा थर साधारणपणे ३ ते ४ इंच इतका खोडाच्या चारही बाजूंनी करावा. बागेत ६० ते १०० मायक्रॉन जाडीच काळ्या रंगाच प्लॅस्टिक आच्छादन कराव. झाडावर ५ ते ८ टक्के तीव्रतेच्या बाष्परोधकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.याशिवाय झाडाच्या आळ्यात मटाका सिंचनाने पाणी दिले तरी जमिनीत ओलावा टिकून राहतो. बागेभोवती वारा प्रतिबंधक कुंपण केल्यासही बागेच उन्हापासून संरक्षण होतं. नवीन लागवड केलेल्या झाडांना गोणपाट किंवा जुन्या साड्या लावून सावली करावी.सायंकाळच्या वेळी संपूर्ण झाडावर एक दिवसाआड पाण्याचा फवारा पंपाने करावा. पिकाची





पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पानांवर १ ते दीड टक्के पोटॅशिअम नायट्रेट द्रावणाची फवारणी करावी. याशिवाय कडक उन्हात पेरु बागेला जर पाणी कमी पडत असेल तर फूलगळ, फळगळ होते. लहान फळे पिवळी पडून गळतात. झाडाची पाने सुकतात, करपतात. बागेतील उघडी पडलेली फळे कडक उन्हामुळे अकाली पिवळी पडतात.फळांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. तापमान वाढीमुळे फळांची गुणवत्ताही खालावते. अशा वेळी लक्षणे ओळखून लगेच उपाय करावे लागतात. उपाय करताना..पेरु बागेतील काळी पडलेली, वाळलेली फळे आणि झाडाखाली गळून पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. झाडातून होणारं पाण्याचं बाष्पीभवन कमी होण्यासाठी केओलिनच्या ८ टक्के द्रावणाची फवारणी करावी.केओलीनची फवारणी केल्यामुळे पिकाच्या पानांवर तसच फळांवर पातळ पांढरा थर तयार होतो. हा पांढऱ्या रंगाचा थर तीव्र सूर्यकिरणे पानांत किंवा फळांत जाऊ न देता तो वातावरणात परावर्तित करतो. त्यामुळे पानांमधून होणारे बाष्पोत्सर्जन २५ ते ३० टक्क्यांनी कमी होतं. कमी पाण्यातही पीक तग धरुन राहतं. दुष्काळी परिस्थितीत झाडे तग धरून राहण्यासाठी १ टक्के पोटॅशिअमची फवारणी केली तरी चालते. तसेच हलकी छाटणी करून झाडाचा आकार मर्यादित ठेवावा. त्यामुळे झाडाची पाण्याची गरज कमी होते. फळमाशीच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति हेक्टरी १० कामगंध सापळे लावावेत. अशा प्रकारचे उपाय करुन कडक उन्हापासून पपई आणि पेरु बाग वाचवता येते.

# स्वामी समर्थांचा मंत्र ऊर्जा देणारा, आधार देणारा-जयदत्त क्षीरसागर

केज । प्रतिनिधी

अक्कलकोट स्वामी महाराजांच्या प्रमुख मठापैकी एक महत्त्वाचा सांप्रदायिक मठ असा नावलौकिक असलेला केज येथील समर्थ मठ असून भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा समर्थांचा मंत्र माणसाला ऊर्जा देणारा आधार देणारा असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

केज येथे श्री स्वामी समर्थ मठ संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट देऊन स्वामी समर्थांच्या पादुकांचे दर्शन घेतले तसेच यावेळी सुरू असलेल्या कथेचे श्रवण केले. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ह.भ.प. भालचंद्र देव, विलास बडगे,दिनकर कदम,अरुण डाके,नानासाहेब काकडे,हर्षद क्षीरसागर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,केज शहरात स्वामी समर्थ यांच्या



स्वतःहून दिलेल्या पादुका आणि त्यांचे वापरातील वस्तू दीडशे वर्षांपासून पूजल्या जात आहेत.

या मठाच्या स्थापनेला दीडशे वर्ष झाले असले तरी याद्वारे दरवर्षी पाडव्याला मोठा उत्सव साजरा केला जातो आणि स्वामींचे स्मरण भक्ती भावाने केले जाते. अक्कलकोट येथे केजकर स्वामींची समाधी आहे.निरंतर देशपांडे यांची ही परंपरा अखंडित सुरू आहे. इथे प्रत्येकजण जोडला जातो परस्पर भावना जोडून ठेवणारा हा मठ असून बीड जिल्ह्याचा हा ठेवा आहे. अनेक संप्रदाय आहेत त्यात श्रीदत्त संप्रदाय हा पण एक सरळ जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा आहे. स्वामी समर्थ हे कुठल्याही अंधश्रद्धा न बाळगता वास्तवात जीवन कसे जगावे,संस्कारित आयुष्य कसे जगावे हेच सांगतात,भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा मूलमंत्र देऊन त्यांनी रंजल्या गांजल्या लोकांना ऊर्जा दिली. भक्ती भावाने समर्पण करत जो भक्त स्वामींकडे येतो त्याच्या आयुष्याचे कल्याण होते असे अनेकांचे अनुभव आहेत म्हणूनच भक्त स्वामींच्या कृपाशीर्वादाने सुखी जीवन जगत आहेत. बीड जिल्हा हा अध्यात्मिक श्रीमंती लाभलेला जिल्हा आहे त्यामुळेच अनेक गावे समृद्ध झाली आहेत असे सांगून त्यांनी सुरू असलेल्या ह.भ.प. भालचंद्र देव यांच्या कथेचे श्रवण केले यावेळी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, समर्थ भक्त सर्व देशपांडे परिवार यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# युध्दजन्य परिस्थितीमुळे चला हवा येऊद्या कार्यक्रम रद्द

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम देशात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे रद्द केले असून कुठलेही जाहीर कार्यक्रम होणार नसल्याचे संयोजकांनी सांगितले. दरम्याण चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पडतेत पुढे. दोनही कार्यक्रम युध्द संपल्यानंतर निश्चित घेवू अशी माहिती भाजपा चे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी दिली. राजकारण करताना देशभक्तीतली संवेदनशिलता कशी जपल्या जाते याचे आदर्श उदाहरणच म्हणावे लागेल.

उद्याच्या १३ मे रोजी भाजपा चे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस असून त्यानिमित्ताने शहरात कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमाचे केले होते. ज्यामध्ये चला हवा येऊद्या, प्रसिध्द अभिनेते निलेश साबळे यांचा कार्यक्रम तर मराठी पाऊल पडते पुढे आदी सांस्कृतिक कार्यक्रम १३ मे ला शहरात होणार होता. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्व तयारी जोरदार केली होती. त्यासाठी मध्यवर्ती असलेल्या सेंट अँथोनी शाळेचे मैदान पण निवडले होते. मात्र दोन दिवसापासून पाकिस्थान सोबत सुरू झालेले युध्द त्यानंतर संपूर्ण देशात निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अक्षय मुंदडा यांनी स्वतःच वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्याच्या सुचना आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना केल्या असून कोणीही मोठा गाजावाजा करत कार्यक्रम करू नये असे सांगितले त्यामुळे चला हवा येऊद्या हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. दरम्याण सद्यस्थितीत कार्यक्रम रद्द झाला असला तरी, याच सांस्कृतीक कार्यक्रमाची मेजवाणी आम्ही निश्चितच युध्दजन्य परिस्थिती संपल्यानंतर शहरवासियांना देणार असल्याचे भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी सांगितले. दि. २२ एप्रिल रोजल पाकिस्थानी दहशतवादी पहलगाम येथे दुष्कर्म घडवले होते ज्यांला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली दृढ निश्चय तथा सैनिकाच्या शौर्याने योग्य उत्तर देणे चालू आहे. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचे मुंदडांनी कळवत आपल्यातली संवेदनशीलता दाखवली.

# विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत छंद ही जोपासावा-कसबे

## न्यू इंग्लिश स्कूलचा समर कॅम्प संपन्न



अंबाजोगाई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत छंद ही जोपासावा असे प्रतिपादन पत्रकार दादासाहेब कसबे यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या समर कॅम्प समारोप प्रसंगी केले. येथील एम.आय.टी. न्यू इंग्लिश स्कूल, गुरुवार पेठ या शाळेत येथे आयोजित समारोपाच्या या कार्यक्रमात प्रमुखपाहुणे दै. अभिमानचे पत्रकार श्री दादासाहेब कसबे ,श्री सरस्वती पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य शरद बोंदर, अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री महेश भस्मे उपस्थित होते.

न्यू इंग्लिश स्कूल, शाळेत समर कॅम्प २०२५ मध्ये विविध शाळेतील ५० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात विविध बौद्धिक खेळासह, अबॅकस, योगा, चित्रकला, स्टोन पेंटिंग, पॉट पेंटिंग, पोहणे, निसर्ग संवर्धन संदेश देणारी रॅली, कथासह अनेक आनंददायी उपक्रम घेण्यात आले. पुढे बोलताना पत्रकार कसबे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत या समर कॅंम्पमध्ये आवडलेली कला शिकत जोपासावी.एखादा छंद पुढे आपल्याला आनंददायी जीवन जगण्यासाठी व आपला उदरनिर्वाह करण्यासही साह्यभूत ठरु शकतो. या शाळेने आपल्याला विविध खेळ, पेंटिंगसह व्यासपीठावर येवून धैर्याने बोलायला शिकवले हि संधी उपलब्ध करून दिली. आपणास हार्दिक शुभेच्छा...!

शरद बोंदर यांनी म्हटले की बालपणा पासून योग केल्याने आपल्या जीवनाला शिस्त लागते त्यामुळे योग आपल्या रोजच्या नित्यामध्ये असावा ,मी लहान असताना पासून सातत्याने योग केल्याने परदेशात लौकिक मिळाला. समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तथा भेटवस्तू देण्यात आली.

या समर कॅम्पचे नेतृत्व सौ. अनुजा पवार यांनी केले. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा समर कॅम्प यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. मुख्याध्यापक श्री महेश भस्मे सरांनी पुढील वर्षी यापेक्षा अतिशय जोमाने आनंददायी वातावरणामध्ये समर कॅम्प आयोजित केला जाईल असे आश्वासन दिले. संस्थेचे कार्यकारी संचालक श्री राजेश कराड, प्रशासकीय अधिकारी सौ.शुभांगी ताई कराड, संचालक संगप्पा यांचे मार्गदर्शन यासाठी लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अनुजा पवार तर आभार श्री शेप यांनी मानले केले.

# घरात घुसून छेड काढल्याच्या आरोपातून लाईनमन गजानन धुमाळ यांची निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील पाटील गल्ली येथे कार्यरत असलेले तात्कालिन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एप्रिल २०१८ च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव शहरातील पाटील गल्ली भागातील घरात घुसून महीलेची छेड काढुण,शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती. सदर तक्रारीवरून तपासी अंमलदार डी.ए.सरवदे यांनी तपास केला व तपासानंतर आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले व त्यामध्ये फिर्यादी, साक्षीदार,तपासी अंमलदार यांचे जबाब नोंदवल्यानंतर आरोपीचे विधीज्ञ ॲड.नारायण गोले यांनी प्रकरणात अंतिम युक्तिवाद केल्यानंतर दि.०८ मे रोजी आरोपी लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांची माजलगाव येथील चौथे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम ए कुलकर्णी यांनी सबळ पुराव्याअभावी आरोपी निर्दोष मुक्तता केली.

प्रकरणी हकिकत अशी की,शहरातील पाटील गल्ली भागातील तात्कालीन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एप्रील २०१८ च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव शहरातील पाटील गल्ली भागात राहणाऱ्या एका महिलेची घरात घुसून छेड काढुण,शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती, सदर फिर्यादी वरुन आरोपी गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात गु.र.न.१२७/२०१८ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ प्रमाणे नोंदवण्यात आला होता,प्रकरणात तपासी अंमलदार डी के सरवदे यांनी प्रकरणात साक्षीदार यांचे जबाब नोंदवून व तपास करुन आरोपी विरुद्ध आरोपपत्र दाखल केले,त्यानंतर प्रकरणात फिर्यादी,तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांचे जबाबा नंतर चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एम ए कुलकर्णी यांच्या समोर आरोपीचे विधिज्ञ ॲड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एम.ए.कुलकर्णी यांनी दि.०८मे रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपी गजानन नारायण धुमाळ यांची निर्दोष मुक्तता केली.

# बार्शी नाका परिसरात गुटख्याची सर्रास विक्री

बीड प्रतिनिधी । प्रतिनिधी

बार्शी नाका परिसरात गुटख्याची विक्री कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, अशी जोरदार चर्चा सध्या शहरात सुरू असून, पोलिसांच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात अवैध गुटखा विक्री सुरू असून, अधूनमधून कारवाया होतात मात्र त्या केवळ वरवरच्या असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. विशेष म्हणजे, इमामपूर रोडवरील एका दुकानातून मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री होत असल्याची माहिती असूनही पोलिस यंत्रणा याकडे डोळेझाक करत असल्याचे आरोप होत आहेत.

पोलीस अधीक्षकांकडून जिल्ह्यात गुटखा माफियांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाया सुरू असतानाही बार्शी नाका परिसरात या अवैध व्यवसायाचे धडे निर्भयपणे सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या माफियांना कुणाचा आश्रय आहे का? आणि पोलिसांकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून बार्शी नाका परिसरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे. गुटखा माफियांना रोखण्यासाठी अधिक प्रभावी आणि सातत्यपूर्ण उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी अपेक्षा आहे.

# परमार्थ आणि विज्ञानाची सांगड घालून केलेले समाजकार्य म्हणजे ईश्वर सेवा होय - डॉ.इंगोले

## दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

रक्तदान ही सेवा सर्वोच्च मानवी सेवा आहे. यामुळे एखाद्या मृत्यू पावणाऱ्या रूग्णाचे प्राण वाचविता येतात, हे प्राण वाचविण्याचे दैवी काम रक्तदाते करीत असतात. परमार्थ आणि विज्ञान यांची परस्पर सांगड घातल्यास आणि त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी केल्यास ही मानवी सेवा ही ईश्वर सेवा केल्यासारखीच आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

महाराष्ट्र संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये सर्व संतांनी मानवी सेवा केल्यास ईश्वरी सेवेचा पुण्य मिळेल असं वारंवार सांगितल आहे.

यात संतांच्या वैचारिक मार्गदर्शनानूसार समाजसेवेचा ऐतिहासिक वारसा जपत श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित यांच्यातर्फे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, या देशांमध्ये सर्व महापुरूषांनी संत विचारास आत्मसात करून जनतेच्या हितासाठी कार्य केलेले आहे. याच कार्याचा वारसा जोपासत समाजातील ही तरूण पिढी अध्यात्म आणि विज्ञान यांची परस्पर सांगड घालत सेवा करीत आहेत. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे असे डॉ.इंगोले यांनी सांगितले. श्री स्वामी समर्थ केंद्रातर्फे आयोजित या रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी सेवेकरी नरसिंग लोमटे, प्रकाश चव्हाण, विनोद कदम, श्रीनिवास रोगे, अशोक महामुने, ज्ञानेश्वर गडदे, सिद्धेश्वर कदम, हाटे, प्रदीप महाळकर, विकास सत्वधर यांनी परिश्रम घेतले.

# भाऊ ही सज्ञा सद्गुरू बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली -विठ्ठल महाराज

## संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव

बीड । प्रतिनिधी

भाऊ ही सज्ञा सद्गुरू बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली.आमचे कुळ आणि मूळ बंकटस्वामी आहे.असे प्रतिपादन महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथ गडकर यांनी केले संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती महाराज चोरमले , अर्जुन महाराज शिंदे,जनार्धन महाराज बांगर,श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत



बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या आजी संसार सुफळ जाला गे माये । देखियले पाय विठोबाचे ।। तो मज व्हावा तो मज व्हावा । वेळों वेळां व्हावा पांडुरंग ।। बापरखुमादेविवरू न विसंबे सर्वथा । निवृत्तीने तत्त्वतां सांगितले ।। या अभंगावर चिंतन मांडले यावेळी बोलताना विठ्ठल महाराज म्हणाले की. संत बंकटस्वामी महाराज आणि संत वामनभाऊ महाराज यांचे गुरूशिष्य अतूट नाते होते. एका अधिकमासात कीर्तन महिनाभर झालेला विषय परत आला नाही पाहिजे. अस बंकटस्वामी महाराज यांनी सांगितले. त्यावेळी संत वामनभाऊ यांनी किर्तन केले त्यावेळी स्वामी खुश झाले आणि त्यानंतर भाऊ ही सज्ञा स्वामी महाराजांनी दिली.असा इतिहास विठ्ठल महाराज यांनी सांगितला.

पुढे बोलताना स्वामीच्या काकडा भजनाला १० हजार भाविक भक्त पहाटे उपस्थित राहत.रामकृष्ण हरी सप्ताह स्वामी महाराजांनी सुरुवात केली. बंकटस्वामी हे कामधेनू आहेत त्या कामधेनुचे दूध आम्हाला प्यायला मिळाले असेही महाराज म्हणाले. आचार,विचार आणि संस्कार.. या गोष्टी आध्यात्मिक साधकांनी पाळल्या पाहिजेत. स्वामी महाराज हे वारकरी पंथाचे मालक होते. प्रत्येकाने आपले मूळ आणि कुळ शोधले पाहिजे.संत वामनभाऊ महाराज यांचे कुळ आणि मूळ स्वामीची गादी आहे त्यामुळेच तर वामन भाऊंच्या आरतीत कृपा अखंड बंकटस्वामीची असा उल्लेख आढळतो.

आम्ही स्वाभिमाने सांगतो आम्ही स्वामीचे आहोत काहीना नाव घ्यायला संकोच होतो असे विठ्ठल महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत श्री ह भ प सर्वश्री रोहिदास महाराज शिंदे,वारकरी भजन स्वरवैभव अशोक शास्त्री महाराज, वसंत महाराज शिंदे, सतीश महाराज जाधव, मृदंग साथ राम महाराज, अभय महाराज कोकाट यांच्यासह बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी गुरुजन मंडळी व विद्यार्थी मंडळी उपस्थित होते.

# माजलगावच्या कोष्टी समाजाने जोपासली सामाजिक बांधिलकी

## नितीन जुजगर यांच्या हस्ते माजलगाव बसस्थानकात पाणपोईचे उद्घाटन



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात कोष्टी समाजाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.दि ०९ मे शुक्रवार रोजी महाराणा प्रताप जयंतीचे औचित्य साधून माजलगाव बसस्थानकात प्रवाशांसाठी मोफत पाणपोई सुरू करण्यात आली.

या पाणपोईचे उद्घाटन कोष्टी समाजातील तरुण आणि उत्साही कार्यकर्ते नितीन जुजगर यांच्या हस्ते पार पडले.या उपक्रमामुळे बसस्थानकात येणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांना कडक उन्हाळ्यात थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

कोष्टी समाज माजलगावने आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून केलेल्या या उपक्रमाचे शहरातील नागरिक व प्रवासी यांनी स्वागत केले. उद्घाटनप्रसंगी अनेक मान्यवर नागरिक, समाजबांधव तसेच प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक कार्याच्या दिशेने कोष्टी समाजाने उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.१० मे २०२५



# मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा



**मुंबई । प्रतिनिधी**

**भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.**

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे... प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा., ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा., केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या., प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. , प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा., एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी पान २ वर

# बीड जिल्हाधिकाऱ्यांनी सुरू केला तीन दिवस जनता दरबार

## जिल्ह्यातील तहसीलदारांनी निदान आठवड्यातुन एक दिवस तरी घ्यावा-गणेश शेवाळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या तक्रारी, अडचणी व निवेदने थेट ऐकण्यासाठी आठवड्यातून तीन दिवस 'जनता दरबार' आयोजित केला जात आहे. या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी बीड जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनीही निदान आठवड्यातून एक दिवस जनता दरबार घ्यावा, अशी मागणी केली आहे.गणेश शेवाळे म्हणाले, ''जिल्हाधिकाऱ्यांकडून लोकाभिमुख प्रशासनाची चांगली सुरुवात झाली आहे. मात्र तालुका पातळीवर अद्याप नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकण्यासाठी कोणतीच ठोस व्यवस्था नाही. त्यामुळे जिल्ह्यातील तहसील कार्यालयातही आठवड्यातून एक दिवस तरी जनता दरबार घेण्यात यावा.''सध्या नागरिकांना आपल्या तक्रारींसाठी वारंवार तहसील कार्यालयाचे चकरा माराव्या लागतात. तक्रारी वेळेत न सुटल्यामुळे नाराजी वाढत आहे. तहसीलदारांनी ठराविक दिवशी नागरिकांची थेट गाऱ्हाणी ऐकून तत्काळ निराकरण केल्यास लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही गणेश शेवाळे यांनी नमूद केले.

पाटोदा तालुक्यातील नागरिकांची प्रतिक्रिय ''तहसील कार्यालयात एक दिवस ठरवून अधिकारी थेट भेटले, तर आमच्यासारख्या ग्रामीण भागातील लोकांना मोठा दिलासा मिळेल,'' असे अनेकांचे मत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपक्रमाचे अनुकरण करत तहसीलदारांनीही लोकाभिमुख कार्यपद्धती अवलंबावी, अशी आता जनतेची आणि सामाजिक कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे.

# डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा जशने शादी सोहळा



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.तथा प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांचे चिरंजीव तथा आष्टी येथील सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा विवाह औ,बाद अर्थात छ.संभाजीनगर येथील डॉ.शेख अब्दुल कादर कादरी यांची कन्या डॉ.मेहवश गौसिया हिच्याशी बुधवार दिनांक सात मे २०२५ रोजी शहनाज फंक्शन हॉल येथे थाटात संपन्न झाला.यावेळी सय्यद आणि शेख परिवारातील आप्त,स्नेही त्याचबरोबर न्यायालयाचे न्यायमूर्ती,मुंबई येथील कन्स्ट्रक्टर मलिक साहेब,पुणे येथील व्यावसायिक सय्यद मगदूम, डॉ.मुजाहिद,प्रा.नरहरी पवार,प्रा.अशोक भोगाडे,प्रा.अनंत देशमुखे,तात्यासाहेब शेंडगे, सचिन रानडे,चिंचाळा येथील माजी सरपंच अशोक पोकळे,दिगंबर पोकळे,गणेश धुमाळ,आत्माराम पोकळे पाटील,सोमीनाथ पोकळे, पान २ वर

# धनादेश न वाटल्याने कर्जदारास बारा महिने कैद

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथील जयनाथ एकनाथ धांडे यांनी मराठवाडा अर्बन को.ऑप. क्रे. सोसा.लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते व सदर कर्जाचे हप्त्या पोटी जयनाथ एकनाथ धांडे यांनी वरील संस्थेस धनादेश दिला होता, परंतू खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने सदर धनादेश न वटता परत आला त्यामुळे वरील संस्थेने आरोपी जयनाथ एकनाथ धांडे याचे विरुध्द कलम १३८ एन.आय. ॲक्ट प्रनाणे प्रकरण दाखल केले होते.**

सदर प्रकरणात मराठवाडा अर्बन को. ऑप. क्रे. सोसा.लि. बीड च्या वतीने प्राधिकृत अधिकारी जालिंदर उत्तम गवळी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी भगवानराव देसाई यांनी दिलेली साक्ष व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करून, मा.५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांनी कर्जदार/आरोपी जयनाथ एकनाथ धांडे, रा. गणेश नगर, बीड यास १२ महिने कैदेची शिक्षा व नुकसान भरपाई पोटी रु.२,१०,२५०/- फिर्यादी संस्थेस देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम ३० दिवसांत न भरल्यास अतिरीक्त ६ महिने कैदेची शिक्षा देण्या बाबत आदेश केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी बँके तर्फे ॲड. रविंद्र एस. वाघमारे यांनी काम पाहिले, त्यांना संस्थेचे विधी सल्लागार डी. एम. डबडे यांनी मार्गदर्शन केले. मा. न्यायालयाचे वरील निकालामुळे संस्थेचे थकीत कर्जदार यांचेत खळबळ माजली आहे.

# रस्ते प्रकरणात सस्ती अदालत मध्ये १९ पैकी ७ प्रकरण निकाली



**अंबड । प्रतिनिधी**

**विभागीय आयुक्त श्री दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या आदेशावरून अंबड तालुक्यात रस्त्याच्या प्रकरणाच्या बाबतीत अंबड तहसील मध्ये सस्ती अदालत घेण्यात आली. सदर वेळी वेगवेगळ्या गावातील १९ प्रकरण सस्ती अदालतीमध्ये घेण्यात आलेली होती त्यापैकी ७ प्रकरणात सामंजस्याने तोडगा निघाला, असून रस्त्याच मार्ग मोकळा झालेली आहे.उर्वरित प्रकरणे हे काही तांत्रिक कारणामुळे क्लियर झालेली नसून येत्या २३ मे रोजी या दिवशी ठेवण्यात आलेली आहे.**

काही प्रकरणांमध्ये किरकोळ स्थळ पाहणी करण्याची विनंती दोन्ही बाजूंनी केल्यामुळे तशी विनंती मान्य करण्यात आलेली आहे.येत्या २३ मे ला इतर प्रकरण हे सस्ती अदालतीमध्ये निकाली निघतील. सदरील मोहीम विभागीय आयुक्त श्री दिलीप गावडे त्याचबरोबर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ ,अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रीता मेत्रेवाड , निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्या मार्गदर्शनाअन्वये ही मोहीम राबविण्यात आलेली आहे. अशी माहिती प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे. ते म्हणाले की या मोहिमेत अनेक शेतकऱ्यांचे जे किरकोळ शेती रस्त्याचे प्रश्न होते ते निकाली निघालेले आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केलेले आहे. विशेष बाब म्हणजे मंडळ अधिकारी वडीगोद्री संदीप पान २ वर



# युद्धजन्य परिस्थितीमध्ये अंतर्गत सुरक्षिततेसाठी सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद बीडच्या वतीने जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांना निवेदन देण्यात आले. पहलगाम, काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीत बीड शहरात मॉक ड्रिल राबवण्यात यावी. या मॉक ड्रिलसाठी नेहमीच सज्ज आहे. आणि प्रशासनासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यास तयार आहे. या संदर्भातले निवेदन देऊन चर्चा करण्यात आली. अभाविप नेहमीच राष्ट्र प्रथम मानणारी संघटना आहे. त्यामुळे या परिस्थितीमध्ये सुद्धा आम्ही सर्व युवा प्रशासनासोबत एकजुटीने उभा आहे असे सांगण्यात आले. यावेळी प्रदेश सहमंत्री स्वप्निल बगाडे, पान २ वर

# वाळू माफियावर कारवाई १० लाखाचा मुद्देमाल जप्त



**अंबड । प्रतिनिधी**

अंबड पोलीसांची मध्यरात्री अवैधरित्या गैणखणिज वाळुचे उत्खनन करुन चोरी करणारे वाळमाफीयावर कारवाई करुन १० लाख रुपयाचा मुद्देमाल केला जप्त पोलीस ठाणे अंबड हद्दीत ९ मे रोजी गोपनिय बादमीदाराकडुन माहीती मिळाली कि, चिंचखेड शिवारातील गलाटी नदीपात्रात काही लोक ट्रॅक्टरद्वारे अवैधरित्या गैणखणिज वाळुचे उत्खनन करुन चोरी करत असल्याची माहीती मिळाल्याने सदरबाबत कारवाई करण्यासाठी पोलीस ठाणे अंबड प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक अमोल गुरले व पोउपनि ठुबे, पो.ह.२६२/ रविंद्र चव्हाण, पो.ह. ११७७/हरकळ, पो.शि १२९४/पांढरे, पो.शि १६३२ भांगळ, पो.शि. ६२६/भानुसे असे रात्री ०३.३० वाजताचे सुमारास चिंचखेड शिवारात गलाटो नदीपात्रात अचाणक छापा मारला असता सदर ठिकाणी ०२ टॅक्टर, ०२ ट्रॉलीसह व दोन ब्रास पान २ वर

# संत गजानन महाराज मंदीरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम उत्साहात

## धर्म,शास्त्र,ग्रंथाचा अभ्यास करून मुर्तीची निर्मिती, भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा: मंदीर समितीचे आवाहन





**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील सहयोगनगर भागात असलेल्या ब्रह्माण्डनायक संत गजानन महाराज मंदीरात गणनायक श्री गणेशाची व गुरूनायक श्री दत्त गुरूच्या मुर्तीची उत्साहात प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. यानिमित्त मंदीरात तीन दिवस धार्मिक कार्यक्र माचे आयोजन करण्यात आले होते.**

शहरातील संत गजानन महाराज मंदीराला २५ वर्षे पुर्ण झाले असून या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त भाविकांच्या मदतीने नुतनीकरण करण्यात आले असून भव्य अशा मंदीरात आता श्री गणेशाच्या मुर्तीबरोबरच दत्त गुरूची मुर्ती बसविण्यात आली असून पुढील टप्प्यात प्रभु श्रीराम, लक्ष्मण,सीता आणि हनुमंताच्या पान २ वर

# बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्गाचे लोकार्पण

## मेट्रो तीनच्या अंतिम मार्गाचे ऑगस्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण- मुख्यमंत्री



**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे मेट्रो ३ मार्गिकेवरील टप्पा २ अ बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानका दरम्यानच्या (९.७७ किमी) सेवेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. मेट्रो तीनच्या आचार्य अत्रे चौक ते कुलाबा या मार्गावरील अंतिम टप्प्याचा शुभारंभ येत्या ऑगस्ट महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.**

मुंबई मेट्रो लाईन-३ (फेज २ - बीकेसी ते आचार्य अत्रे चौक) सेवेच्या विस्तार शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीकेसी स्थानकातून हिरवी झेंडी दाखवून केला. त्यानंतर मान्यवरांनी बीकेसी ते सिद्धीविनायक मेट्रो स्थानकादरम्यान प्रवास करत मेट्रोचा आनंद लुटला. यावेळी जपानचे महावाणिज्यदूत यागी कोजी सान, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आदी उपस्थित होते. मेट्रोच्या शुभारंभानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे मेट्रो ३ च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या १३ किमी मार्गाचे लोकार्पण ७ ऑक्टोबर २०२४ रोजी झाले. आता फेज २ - बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्ग हा दुसरा टप्पा उद्यापासून नागरिकांसाठी खुला होणार आहे. आतापर्यंत २२ किमी मेट्रो सुरू झाली आहे. मेट्रोचे काम वेगाने पूर्ण करण्यात येत असून मेट्रो तीनचे काम अंतिम टप्प्यात पोचले आहे. येत्या ऑगस्टमध्ये मेट्रो ३ च्या अंतिम टप्प्याचा मार्गावरील मेट्रो सेवा सुरू होईल. मेट्रो ३ मुंबईतील विमानतळांशीदेखील जोडली जाणार आहे. मेट्रोचे काम हे अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. बीकेसी ते आचार्य अत्रे चौक हा मेट्रोचा मार्ग मिठी नदीच्या खालून जात आहे. त्याचप्रमाणे गिरगाव सारख्या गर्दीच्या ठिकाणीही मेट्रोचे काम सुरळीत झाले आहे. आता अंतिम टप्प्यातील दोन स्थानकांची पान २ वर

# ऑपरेशन सिंदूरचा बीड शहरामध्ये अभाविपकडून जल्लोष!



**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेल्या हवाई हल्ल्याचे देशभरात जल्लोषात स्वागत केले जात आहे. या ऐतिहासिक कामगिरीचे औचित्य साधून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) बीड शाखेच्या वतीने राजीव गांधी चौक परिसरात येथे पेढे वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला, या वेळी प्रदेश सहमंत्री स्वप्निल बगाडे,शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी व आदि अभाविप कार्यकर्ते उपस्थित होते.**

प्रदेश सह मंत्री स्वप्निल बगाडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''भारतीय लष्कराने फक्त दहशतवादावर विजय मिळवला नाही, तर देशातील नागरिकांच्या मनामध्ये आत्मविश्वासाची आणि सुरक्षिततेची भावना निर्माण केली पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# शहरात सलग तिसऱ्या दिवशी अतिक्रमणांवर महापालिकेचा बुलडोजर

**पुणे । प्रतिनिधीं**

**पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने तिसऱ्या दिवशीही अनधिकृत दुकाने आणि पथारीवाल्यांवर कारवाई केली. ही कारवाई भवानी पेठ व कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत शुक्रवारी करण्यात आली.**

यासह परिमंडळ पाच अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याच्या दोन्ही बाजू, शनिवार वाडा ते स्वारगेट चौक रस्ता भागातील पदपथ व फ्रंट तसेच साइड मार्जिनमधील अनधिकृत बांधकाम व पथारींवर देखील बुलडोजर चालवण्यात आला.महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभाग व बांधकाम परवाना विभागातर्फे ही संयुक्त कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संदीप खलाटे व परिमंडळ उपायुक्त सुनील बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त किसन दगडखैर व सुहास जाधव यांच्या नेतृत्वात अतिक्रमांवर बुलडोजर चालवण्यात आला. विजय कुमावत, अभय शिंदे, उमेश नरुले, श्रीकृष्ण सोनार, सुभाष जगताप, नीलेश चव्हाण, शरद मरकड, राहुल महाजन, अविनाश इंगोले आदींच्या पथकाने कारवाई करत सुमारे साडेपाच हजार चौरस फूट क्षेत्र मोकळे केले. या कारवाईत टेबल,खुर्च्या, मंडप, काउंटर असे सुमारे ८ ट्रक पथारी साहित्य जप्त करण्यात आले. शहराच्या विविध भागात ही कारवाई सुरू राहील, असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संदीप खलाटे यांनी सांगितले.

### नगर रस्त्यावरही कारवाई

नगर रस्ता वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील खराडी झेन्सार आयटी पार्क परिसरातील व खराडी मुंढवा बायपास रोड वरील फ्रंट आणि साईड मार्जिन तसेच सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमणांवरही महापालिकेने कारवाई केली. सहाय्यक आयुक्त संजय पोळ यांच्या नेतृत्वात उमेश गोडगे, मंगेश गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई करण्यात आली. येथील व्यावसायिकांनी आपापल्या दुकानाच्या बाहेर मोठ्या प्रमाणावर जागा लोखंडी काउंटर लावून काही व्यावसायिकांना भाड्याने दिली होती. तसेच बाहेरील फ्रंट मार्जिनचाही व्यावसायिक वापर करण्यात येत होता. या कारवाईत ३४ काउंटर, ८ हातगाड्या, सिलिंडर, पथारी, खुर्च्या, टेबल, जाळ्या इतर आदि साहित्य जप्त करण्यात आले.



# पुण्याला अवकाळीने झोडपले; नागरिकांची तारांबळ, ५ दिवस कसे असणार वातावरण?

**पुणे । प्रतिनिधी**


**गेले काही दिवस राज्यातील वातावरणात बदल पाहायला मिळत आहेत. काही ठिकाणी कडक उन्हाळा तर काही जिल्ह्यांत अवकाळी पाऊस कोसळत आहे. दरम्यान आज दुपारच्या वेळेस अवकाळी पावसाने पुणे शहराला देखील झोडपून काढले आहे. पुण्यातील पेठ भाग आणि उपनगरात पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक पाऊस सुरू झाल्याने पुणेकरांची तारांबळ उडाली.**



शुक्रवारी पुण्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. पुढील पाच दिवस शहरांत वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याच्या पुणे वेधशाळेने वर्तविला आहे. गुरुवारपासून पुण्याच्या हवामानात बदल दिसुन येत आहे. तापमानात घट आणि वारे वाहु लागल्याने उन्हाळ्यात पुणेकरांना दिलासा मिळाला. शुक्रवारी दुपारनंतर पुण्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. शहराचे दिवसाचे तापमान सामान्यपेक्षा ४ अंश सेल्सिअसने कमी झाले आहे. वारे वाहत असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. गेल्या २ दिवसांपासून शहरात पश्चिमी विक्षोभाचा परिणाम दिसून येत आहे. शुक्रवारी सकाळी शहराच्या दक्षिण भागात पाऊस सुरु झाला. ग्रामीण भागात अधूनमधून पाऊस पडत होता. शुक्रवारी शहराचे कमाल तापमान ३२.०८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. तसेच, किमान तापमान २१.०७ अंश सेल्सिअस होते. भारतीय हवामान खात्याच्या शिवाजी नगर कार्यालयाने ही माहिती दिली आहे. पुढील पाच दिवस पुणे शहराचे हवामान ढगाळ राहुन दुपारनंतर ताशी तीस ते चाळीस किमी वेगाने वारे वाहुन मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तविला आहे. त्यामुळे पुणेकरांनी पुढील पाच दिवस छत्री, रेनकोट घेऊनच बाहेर पडण्याची गरज आहे.

# शेतकऱ्यांच्या लेकीला एमपीएससीच्या परिक्षेमध्ये भरघोस यश

## गटविकास अधिकारी म्हणून झाली निवड



स्वसुख निरभिलाष खिद्यते लोकहेतोः

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

**मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात शिक्षण घेणारी शेतकरी कुटुंबातील मयुरी यशवंत जांभुळकर (भेगडे) हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश मिळविले आहे. नुकतीच तिची गटविकास अधिकारी म्हणून निवड झाली आहे. वडगाव मावळमधील या कन्येचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. तिच्या यशामुळे वडगाव मावळमधील लोकांनी समाधान आणि कौतुक व्यक्त केले आहे.**

तिने एमपी एससीच्या परीक्षेत चांगले यश मिळवून या पदापर्यंत पोहोचली. मयुरीचा शेतकऱ्याच्या घरात जन्म झाला वडील यशवंत जांभुळकर व आई मंदा वहिले दोन्हीही राष्ट्रीय खेळाडू यशवंत जांभुळकर हे कबड्डी व वेटलिफ्टिंग मध्ये राष्ट्रीय खेळाडू व मंदा वहिले (जांभुळकर) या अथलेटिक्स मध्ये रनिंग या विभागांमध्ये राष्ट्रीय खेळाडू म्हणून परिचित होत्या. त्यांनी खेळाच्या जोरावर इन्कम टॅक्स ऑफिसर पर्यंत मजल मारली आहे. तिचे वडील यशवंत जांभुळकर हे शेतकरी असून काळ्या आईची ते सेवा करतात. मयुरीचे प्राथमिक शिक्षण तळेगाव येथील सरस्वती विद्यामंदिर येथे झाले. पुढील शिक्षण डी फार्मसी तिने पुण्यामध्ये केले. त्या पदवीनंतर स्पर्धा परीक्षा दिल्या व यश संपादन करत प्रथम मागच्या वर्षी तलाठी म्हणून निवड झाली. त्यानंतर एमपी एससीची परीक्षा पास करून गटविकास अधिकाऱ्याच्या पदापर्यंत मजल मारली. तिच्या या यशामुळे मावळ तालुक्यात तिचं संपूर्ण कौतुक होत आहे. वहिले परिवार व जांभुळकर परिवार यांनी मयुरीला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

# माजी आयपीएस अधिकाऱ्याला ५० लाखाचा गंडा



**पुणे । प्रतिनिधी**

**शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवत माजी आयपीएस अधिकाऱ्याला ५० लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपीने दुबईत पळ काढला असल्याची प्राथमिक माहिती आहे.**

वाकड येथे राहणाऱ्या ८० वर्षीय माजी आयपीएस अधिकाऱ्याने तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राजीव अशोक केंद्रे (सध्या दुबई, मूळ लातूर) आणि हर्षल अशोक कुलकर्णी (रा. कोथरुड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी राजीव याच्यावर अगोदर दोन गुन्हे दाखल आहेत. त्यांनी डेक्कन येथील आरोपीच्या कार्यालयास भेट दिली होती. आरोपी राजीव केंद्रे योग्य प्रकारे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून चांगला परतावा देतात, अशी माहिती त्यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कार्यालयात भेट दिली असता, त्यांना चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानुसार फिर्यादीने धनादेशाव्दारे ५० लाखांची गुंतवणूक केली. मात्र, परतावा मिळत नसल्याने त्यांनी कार्यालयात धाव घेतली. तेव्हा त्यांना कार्यालय बंद असल्याचे आढळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

# तरूणीकडून सोशल मीडियावर पाकिस्तान जिंदाबादची घोषणा, गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात वास्तव्यास असलेल्या एका तरुणीने सोशल मीडियावर 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा देणारी पोस्ट शेअर केल्याने खळबळ उडाली आहे. सकल हिंदू समाजाने ही माहिती एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध करत या प्रकरणी कारवाईची मागणी केली.

या पोस्टमुळे संतापाची लाट उसळली असून, कोंढवा पोलिस ठाण्यात तरुणीविरोधात गुन्हा दाखल करण्या आला आहे. सकल हिंदू समाजाच्या मते, पुण्यात शिक्षण घेणारी ही तरुणी तिच्या इंस्टाग्राम हँडलवरून पाकिस्तानच्या समर्थनार्थ पोस्ट लिहित होती. तिने 'पाकिस्तान जिंदाबाद' अशा घोषणा लिहिल्याचा दावा करण्यात आला आहे. ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर तिने तिचे इंस्टाग्राम अकाउंट डिलीट केलं. मात्र, या प्रकरणाने सोशल मीडियावर तीव्र पडसाद उमटले असून, अनेकांनी यावर संताप व्यक्त केला आहे. कोंढवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर यांनी सांगितले की, या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. बीएनएस १५२, १९६, १९७, २९९,३५२,३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गावतच ठाण मांडण्याची पोलिस पाटलांना सूचना

**मंचर । प्रतिनिधी**

**भारत व पाकिस्तान यांच्यातील सध्या निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील सर्व पोलिस पाटलांनी आपल्या गावातच ठाण मांडून सतर्क राहण्याचे आवाहन मंचर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी केले आहे.**




यासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मंचर पोलिस ठाण्याचे अधिकारी कंकाळ, पारगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नेताजी गंधारे, तसेच घोडेगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांनी गावातील पोलिस पाटलांना पुढील सूचना दिल्या. सध्या देशात निर्माण झालेल्या संवेदनशील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक प्रशासन व पोलिस विभाग या दोघांनीही नागरिकांनी सतर्क आणि जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. गावात अनोळखी व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. गावात येणाऱ्या लोकांवर सतत लक्ष ठेवावे. पोलिस विभागाकडून वेळोवेळी येणाऱ्या सूचनांचे पालन करावे. गावातील सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, तरुण मंडळी यांच्या संपर्कात राहून त्यांची मदत घ्यावी. पोलिस पाटलांनी गावातच मुक्कामी राहावे.

# मलठण ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरकडून परिचारिकेला शिवीगाळ करत धमकी; डॉ. राजेश जाधव निलंबित

**शिरूर । प्रतिनिधी**

मलठण (ता.शिरूर) येथील ग्रामीण रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका परिचारिकेला धमकी देत जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी व कर्मचाऱ्यांशी उद्धट वागल्याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश जाधव यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकारामुळे रुग्णालयातील वातावरण तणावपूर्ण बनले असून, कर्मचारी सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १६ एप्रिल रोजी परिचारिका विद्या गिरीगोसावी यांनी बाह्यरुग्ण विभागातील रूग्णांसंदर्भात माहिती देण्यासाठी डॉ. राजेश जाधव यांना फोन केला असता, त्यांनी फोनवरच अपशब्द वापरत शिवीगाळ केली. त्यानंतर रुग्णालयात उपस्थित होऊन त्यांनी इंजेक्शन विभागात काम करत असलेल्या गिरीगोसावी यांना धमकावले, तसेच "तुझी लायकी नाही येथे बसण्याची" असे म्हणत अपमानित केले. या प्रकरणी गिरीगोसावी यांनी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यानंतर रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांनीही एकत्र येत डॉ. जाधव यांच्या अरेरावी व अवमानकारक वागणुकीविरोधात वैद्यकीय अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दिली. तक्रारीची गंभीर दखल घेत, प्राथमिक चौकशीनंतर डॉ. जाधव यांना निलंबित करण्यात आले असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अतूल नागरे यांनी सांगितले. मात्र, निलंबनानंतरही ते रुग्णालयाच्या निवासस्थानातच वास्तव्य करत असून कर्मचाऱ्यांना मनस्ताप देत असल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. डॉ. जाधव यांच्यावर यापूर्वीही कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन केल्याचे आरोप झाले होते. त्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती थांबवण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने अधिक ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी कर्मचारी व स्थानिकांकडून होत आहे. या घटनेनंतर रुग्णालयातील कर्मचारी वर्गात भीतीचे वातावरण असून, रुग्णसेवेवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. आता या प्रकरणी आरोग्य विभाग काय पावले उचलतो. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुण्याकडं जाणाऱ्या येरवडा पुलावर पडला खड्डा!

## वाहनांच्या लांबच-लांब रांगा; हे वापरा पर्यायी मार्ग

**येरवडा । प्रतिनिधी**

**येथील जुन्या तारकेश्वर पुलाचा काही भाग अचानक खचल्यानं कोरेगाव पार्कच्या दिशेनं जाणारी डावी मार्गिका बंद करण्यात आली आहे. त्यामुळं येरवड्याहून पुण्याकडं जाणाऱ्या वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या आहेत.**

या पुलाच्या दोन्हीही बाजूंनी एकेरी वाहतूक आहे. आज अचानक या पुलाच्या डाव्या बाजुच्या मार्गिकेवर मध्येच खड्डा पडला. तसंच त्यातून बांधकामासाठी वापरलेल्या लोखंडी सळया वर आल्यानं अपघात टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी बॅरिकेट लावून या मार्गावरील वाहतूक थांबवली आहे. त्यामुळेच एक मार्गिका बंद केल्यानं या ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. या पुलावरुन पुणे-नगर रस्ता, लोहगाव, येरवडा, टिंगरे नगर या भागातून पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या अधिक असते. हा दुहेरी पूल आहे पण दोन्ही बाजुंनी एकेरी वाहतूक चालते. हा पूल सर्वाधिक सर्वाधिक वाहनांमुळं व्यस्त असलेला पूल आहे. दरम्यान, पुणे स्टेशन, स्वारगेट परिसरात जाणाऱ्या वाहन चालकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करावा, असं आवाहन प्रशासनाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

**पर्यायी रस्ते:** विमानतळ रस्त्यावरुन पुण्याकडं जाणाऱ्या वाहनांनी - फाईव्ह झिरो नाईन मार्गे कल्याणी नगर - पुढे इच्छित स्थळी जावे. विश्रांतवाडीवरुन पुण्याकडं जाणाऱ्यांनी - डेक्कन कॉलेज मार्गे संगमवाडीवरुन पुढे जावे.

# अकरावीसाठी १०० रुपये नोंदणी शुल्क!

## आता सगळ्याच महाविद्यालयात ऑनलाइन प्रवेश, १ ते १० पसंतीक्रम भरता येणार

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामधील इयत्ता अकरावीचा प्रवेश ऑनलाइन पद्धतीने दिला जाणार असून, त्यासाठी राज्य शासनातर्फे स्वतंत्र नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून नोंदणी शुल्क १०० रुपये आकारले जाणार असून, विद्यार्थ्याला आपल्या पसंतीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेता यावा, यासाठी कमीत कमी एक व जास्तीत जास्त दहा पसंतीक्रम ऑनलाइन प्रक्रियेमध्ये नोंदवता येणार आहेत.**

पुणे, मुंबई यांसह राज्यातील काही मोठ्या शहरांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात होती. परंतु, चालू शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनाने प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामधील अकरावीचा प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश अर्जात वैयक्तिक माहिती भरता येणार आहे. त्यानंतर विद्यार्थी प्रत्यक्ष प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरतील. विद्यार्थ्यांनी द्यावयाचा पसंतीक्रम, प्रवेश रद्द करणे, प्रवेश न घेतल्यास प्रतिबंधित करणे या संदर्भातील कार्यपद्धती राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने अध्यादेशाद्वारे प्रसिद्ध केली आहे. प्रथम प्राधान्यक्रमाच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांचा प्रवेश रद्द करता येईल. तथापि त्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये पुन्हा सहभागी व्हावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांना सर्वांसाठी खुला या विशेष फेरीमध्ये सहभागी होता येईल. प्रथम पसंतीक्रम याव्यतिरिक्त अन्य प्राधान्यक्रमांच्या शाखेत प्रवेश मिळूनही विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास, प्रवेश प्रक्रियेच्या उर्वरित सर्वसाधारण फेरी व विशेष फेरीमध्ये सर्वांसाठी खुला फेरीत सहभाग घेऊ शकतील, तथापि घेतलेले प्रवेश रद्द करण्याची मुभा असेल. प्रवेश रद्द केल्यानंतर उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय बदलण्यासाठी अर्ज करता येईल. महाविद्यालयात विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासून एकदा प्रवेश निश्चित केल्यास त्या प्रवर्गातील उमेदवारास प्रवेश रद्द करून दुसर्या ठिकाणी प्रवेश (गुणवत्तेनुसार) मिळाल्यास तो विद्यार्थी पात्र असेल. नवीन प्रवेशित उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न उच्च माध्यमिक शाळा यामध्ये कागदपत्रे पडताळणीची आवश्यकता असणार नाही. मूळ कागदपत्रे नवीन प्रवेशित उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयात जमा करावी लागणार आहेत. खासगी व्यवस्थापनाच्या शाळांना शासनाचे नियम डावलून एकही प्रवेश ऑफलाइन पद्धतीने करता येणार नसल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.



### प्रथम प्राधान्यक्रमांकाच्या महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेशाकरिता प्राधान्यक्रम भरताना किमान १ प्राधान्यक्रम भरणे अनिवार्य असेल व कमाल १० पसंतीक्रम भरता येतील. प्रथम प्राधान्यक्रमांकाच्या महाविद्यालयात प्रवेश गुणवत्तेनुसार मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना सर्वांसाठी खुला या फेरीपर्यंत दुसरी, तिसरी व चौथी फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही. नियमित फेरीमध्ये प्रथम प्राधान्यक्रम दिलेल्या विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात जागा मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक असेल.